सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०२४-२०२५

### इतर मागास बहुजन कल्याण विभाग

शासकीय मुद्रणालय, वाई
२०२४

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०२४-२०२५

### इतर मागास बहुजन कल्याण विभाग

## अनुक्रमणिका


| | | | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| (१) प्रस्तावना | ... | ... | ... | १ |
| (२) इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे | ... | ... | ... | १ |
| (३) धनगर समाजासाठीच्या योजना | ... | ... | ... | ३ |
| (४) विजाभज, इमाव व विमाप्र यांचे कल्याण | ... | ... | ... | ४ |
| (५) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म) मुंबई | ... | ... | ... | १५ |
| (६) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ (मुंबई) | ... | ... | ... | १९ |
| (७) महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे | ... | ... | ... | २२ |
| (८) महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) | ... | ... | ... | २४ |
| (९) महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) | ... | ... | ... | २४ |
| (१०) विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची संक्षिप्त माहिती | ... | ... | ... | २६ |


तक्ते


| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) प्रधानशिर्ष निहाय तरतूद | ... | ... | ... | ५८ |
| (२) अर्थसंकल्पीय तरतूद २०२४-२५ | ... | ... | ... | ५९ |
| (३) इतर मागास बहुजन कल्याण विभाग (खुद्द) करिता मंजूर आकृतीबंधानुसार पदांचा तपशिल — | ... | ... | ... | ६३ |
| (४) इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे कार्यालयाची रचना व आकृतीबंधानुसार पदांचा तपशिल | ... | ... | ... | ६४ |
| (५) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई पदांचा तपशिल | ... | ... | ... | ६५ |
| (६) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची रचना व आकृतीबंधानुसार पदांचा तपशिल | ... | ... | ... | ६६ |
| (७) महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे पदांचा तपशिल | ... | ... | ... | ६८ |

# प्रस्तावना

इतर मागास वर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग यांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी असलेल्या विविध योजना यापूर्वी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येत होत्या. तथापि, या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी मंत्रिमंडळाने दि. २७ डिसेंबर २०१६ रोजी झालेल्या बैठकीत विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण हा नवीन विभाग स्थापन करण्यास मान्यता दिलेली आहे. मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार सामान्य प्रशासन विभागाने दि. ९ मार्च २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये इतर मागास बहुजन कल्याण विभाग हा स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आलेला आहे. या विभागासाठी स्वतंत्र सचिव आणि अधिकारी/कर्मचाऱ्यांची एकूण ८९ पदे नव्याने निर्माण करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

इतर मागास वर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गीयांचे कल्याण हे या विभागाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली खालील क्षेत्रिय कार्यालये आहेत :—

(१) संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

(२) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई.

(३) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मर्यादित मुंबई.

(४) महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे.

(५) महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती).

(६) महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), मुंबई.

इतर मागास बहुजन कल्याण :— या विभागात "इतर मागास वर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग" या प्रवर्गांसाठी कल्याणकारी विविध योजना राबविण्यात येतात. या योजना प्रामुख्याने तीन विभागात येतात.

(१) शैक्षणिक योजना.

(२) सामाजिक व इतर सामुहिक योजना

(३) आर्थिक उन्नतीच्या योजना.

शैक्षणिक योजनांमध्ये खालील योजनांचा समावेश करण्यात आला आहे.

(१) राज्य सरकारच्या शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्त्या — विजाभज, विमाप्र व इमाव विद्यार्थ्यांसाठी.

(२) शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रदाने — विजाभज, विमाप्र व इमाव विद्यार्थ्यांसाठी.

(३) सैनिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय, विजाभज, विमाप्र विद्यार्थ्यांना विशेष निर्वाह भत्ता देणे.

(४) स्वेच्छा संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या विमुक्त जाती आणि भटक्या जमातीसाठी आश्रमशाळा उघडणे, चालविणे आणि विकास करणे.

(५) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन देणे. (विजाभज व विमाप्र विद्यार्थ्यांसाठी).

(६) व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असलेल्या वसतिगृहातील विजाभज, विमाप्र विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे.

(७) माध्यमिक शाळेतील विजाभज, विमाप्र विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची योजना. (मुंबई व सर्व जिल्हा परिषदा).

(८) विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या मुला-मुलींसाठी विद्यानिकेतन.

(९) ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलांसाठी निवासी शाळा.

(१०) ५ वी ते ७ वी व ८ वी ते १० वी मधील विजाभज, विमाप्र व इमाव प्रवर्गातील मुलींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना.

(११) इ. १० वीच्या परीक्षेस विशेष प्राविण्य गुण मिळवून इ. ११ वी मधील प्रवेश घेतलेल्या तसेच १२ वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज व विमाप्र वर्गातील मुला-मुलींना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदाने.

(१२) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून विजाभज / विमाप्र उमेदवारांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची योजना (मागेल त्याला प्रशिक्षण).

(१३) विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना दिवंगत वसंतराव नाईक गुणवत्ता बक्षिस योजना.

(१४) विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती.

(१५) (अ) ओबीसी, ईबीसी व डीएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती (केंद्र हिस्सा) ६०%

(१५) (ब) ओबीसी, ईबीसी व डीएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती (राज्य हिस्सा) ४०%

(१६) (अ) ओबीसी, ईबीसी व डिएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (केंद्र हिस्सा) ६०%.

(ब) ओबीसी, ईबीसी व डिएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (राज्य हिस्सा) ४०%.

(१७) इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसह इतर मागास प्रवर्गातील मुलींसाठी वसतिगृहे.
(केंद्र/राज्य हिस्सा).

(१८) वसतीगृह योजनेपासून वंचित असलेल्या इमाव, विजाभज स्वयंम योजनेचा लाभ घेणारे धनगर समाजाचे विद्यार्थी (वगळून) व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना

धनगर समाजासाठीच्या योजना :-

(१) भटक्या जमाती-क या प्रवर्गातील धनगर समाजातील बेरोजगार युवक-युवतींना लष्करातील सैनिक भरती व राज्यातील पोलिस भरतीसाठी आवश्यक ते प्रशिक्षण देणे. २२२५ एफ ३६१

(२) धनगर समाज बांधवांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम भटक्या जमाती-क मधील धनगर समाजातील बेरोजगार युवक-युवतींना स्पर्धा परिक्षेसाठी शुल्कात आर्थिक सवलती लागू करण्याबाबत. २२२५ एफ ३७२

(३) भटक्या जमाती-क मधील धनगर समाजासाठी आवश्यक असलेल्या परंतु अर्थसंकल्पीत निधी उपलब्ध नसलेल्या योजना / कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) २२२५ एफ ३८१

(४) भटक्या जमाती-क मधील धनगर समाजातील विद्यार्थ्यांना संघ लोकसेवा आयोग/महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या स्पर्धा पूर्व परिक्षांसाठी निवासी प्रशिक्षण देणेबाबत. २२२५ एफ ३९९

(५) धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याबाबत. २२२५ एफ ४०५

(६) वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना आदिवासी विकास विभागाच्या स्वयंम योजनेच्या धर्तीवर स्वतंत्र योजना सुरू करणे. २२२५ एफ ४१४

(७) केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजने अंतर्गत धनगर समाजातील महिलांसाठी मार्जिन मनी उपलब्ध करून देणेबाबत.

(८) धनगर समाजबांधवाच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजासाठी घरे बांधण्याची योजना. २२२५ एफ ४६१

(९) धनगर समाज बांधवाच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राज्याच्या महसूली विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी भटक्या जमाती-क (धनगर) प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह निर्माण करणे.

(१०) धनगर व तत्सम समाजातील भूमीहीन मेंढपाळ कुटूंबासाठी अर्धबंदिस्त बंदिस्त मेंढीपालन करण्याकरिता जमीन खरेदीसाठी भाडेतत्वावर घेण्यासाठी ७५% अनुदान. २२२५ एफ ८०८.

(११) धनगर व तत्सम समाजातील मेंढपाळ कुटुंबांना चराई अनुदान. २२२५ एफ ८२६.

(१२) १०० कुक्कुट पक्षांच्या खरेदी व संगोपनासाठी ७५% अनुदान. २२२५ एफ ८१७.

(२) सामाजिक व इतर सामूहिक योजनांमध्ये खालील योजनांचा समावेश आहे :—

(१) वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना.

(२) विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्याकरिता यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना.

(३) मोदी आवास घरकुल योजना.

(४) कन्यादान योजनेअंतर्गत नवविवाहीत दांपत्यांना वित्तीय सहाय्य.

(५) वनीकरण व वन्यजीवन

(६) महात्मा बसवेश्वर सामाजिक समता — शिवा पुरस्कार

उपरोक्त योजनांबाबत मंत्रालयीन स्तरावर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीचे आदेश निर्गमित करण्यात येतात. तसेच सदर योजना राबविण्यात येणाऱ्या अडीअडचणी लक्षात घेऊन सदर योजना वेळोवेळी सुधारित करण्यात येतात. या योजनेच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही संबंधित कार्यासने शासनाने वेळोवेळी दिलेल्या शासकीय आदेश व सूचना लक्षात घेऊन पार पाडतात.

(३) आर्थिक उन्नतीच्या योजना

विभागाच्या अधिनस्थ खालील महामंडळे/संस्था कार्यरत आहेत :—

(१) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ.

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाची स्थापना कंपनी कायदा १९५६ नुसार दिनांक ८ फेब्रुवारी १९८४ रोजी झाली आहे.

(२) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ.

महाराष्ट्र राज्यातील ओबीसी (इतर मागासवर्ग) प्रवर्गाच्या उन्नतीसाठी व त्यांना स्वयंरोजगारासाठी अल्प व्याजदराने वित्त सहाय्य उपलब्ध करून देणे शक्य व्हावे, यासाठी शासनाने दिनांक २५/९/१९९८ रोजी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची स्थापना केली आहे.

(३) महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती)

(४) महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)

**इमाव, विजाभज आणि विमाप्र यांचे कल्याण —**

हा कार्यक्रम इतर मागासवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग यांच्यासाठी आहे. या क्षेत्रातील हा कार्यक्रम स्थूलमानाने तीन वर्गात मोडतो —

(१) शैक्षणिक सवलती.

(२) सामाजिक व इतर सामुहिक योजना.

(३) आर्थिक उन्नती.

(१) शैक्षणिक सवलती —

शिक्षण क्षेत्रात खालील योजनांचा समावेश आहे :—

(१) राज्य सरकारच्या शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्त्या. (विजाभज, विमाप्र व इमाव विद्यार्थ्यांसाठी).

(२) माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या विजाभज, विमाप्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.

(३) शिक्षण फी, परीक्षा फी देण्यापासून सूट देणे व शिष्यवृत्ती देणे. (विजाभज, इमाव व विमाप्र विद्यार्थ्यांसाठी)

(४) सैनिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विजाभज / विमाप्र विद्यार्थ्यांना विशेष निर्वाह भत्ता देणे.

(५) स्वेच्छा संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या विमुक्त जाती आणि भटक्या जमातीसाठी निवासी शाळा उघडणे, चालविणे आणि विकास करणे.

(६) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन देणे.

(७) व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असलेल्या वसतिगृहातील विजाभज / विमाप्र विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे.

(८) विजाभज मुलामुलींसाठी पब्लिक स्कूल, विद्यानिकेतन शाळा सुरू करणे.

(९) ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदान.

(१०) इयत्ता ५ वी ते ७ वी व इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गातील मुलींकरीता सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती.

(११) इयत्ता ११ वी व १२ वी च्या विजाभज. व विमाप्र विद्यार्थ्यांना राजर्षि छत्रपती शाहू महाराज गुणवत्तापूर्ण शिष्यवृत्ती.

(१२) विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग यांच्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण.

(१३) विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दिवंगत वसंतराव नाईक गुणवत्ता बक्षीस योजना.

(१४) विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती.

(१५) (अ) ओबीसी, ईबीसी व डीएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती (केंद्र हिस्सा) ६०%

(१५) (ब) ओबीसी, ईबीसी व डीएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (राज्य हिस्सा) ४०%

(१६) (अ) ओबीसी, ईबीसी व डीएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (केंद्र हिस्सा) ६०%

(१६) (ब) ओबीसी, ईबीसी व डीएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती (राज्य हिस्सा) ४०%

(१७) इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसह इतर मागास प्रवर्गातील मुलींसाठी वसतिगृहे.

(१८) वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या इमाव, विजाभज (स्वयंम योजनेचा लाभ घेणारे धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून) व विमाप्र वर्गातील विद्यार्थ्यांकरिता ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना.

विजाभज, इमाव व विमाप्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रदाने :—

विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे यासाठी शासनाने शालांत शिक्षण फी परीक्षा फी देण्याची योजना शासन निर्णय क्र. ईबीसी/१०६८/८३५६७/जे दि. २४-१२-१९७० अन्वये सन १९७० पासून शासकीय, अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लागू केलेली आहे. शासन निर्णय क्र. ईबीसी/२०१६/प्र. क्र. २२१/शिक्षण-१, दि. ३१ मार्च २०१६ नुसार दिलेल्या अटी व शर्तीनुसार सदर योजनेची कार्यवाही करण्यात येते.

योजनेचा उद्देश :—

(१) विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणे.
(२) शिक्षणामधील गळतीचे प्रमाण कमी करणे.
(३) उच्च शिक्षण घेण्यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे.
(४) उच्च शिक्षण घेऊन आर्थिक उन्नतीच्या संधी निर्माण करणे.

योजनेच्या अटी व शर्ती :—

(१) विद्यार्थी शालांत परिक्षोत्तर शिक्षण घेणारा विजाभज, इमाव व विमाप्र संवर्गातील असावा.
(२) पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. १ लाख ते रु. ०८.०० लाख (क्रिमीलेयरच्या मर्यादेत) असावे.
(३) शासकीय अनुदानित, विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये शिकणाऱ्या इतर अभ्यासक्रमांसाठी शासकीय दराने व व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शासकीय कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विमाप्र विद्यार्थ्यांना शासन निर्णय दि. १२-३-२००७ अन्वये सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षापासून शैक्षणिक शुल्क समितीने/परिषदेने निश्चित केलेल्या दराच्या १०० टक्के शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येते, तर इमाव प्रवर्गासाठी ५० टक्के दराने शैक्षणिक शुल्क दिले जाते.

योजनेची उपयुक्तता :—

शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क योजना ही वैयक्तिक लाभाची योजना असून त्याचा लाभ लाखो विद्यार्थी घेत आहेत. उच्च व व्यावसायिक शिक्षण घेऊन विजाभज विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगार मिळण्यासाठी सदर योजना अत्यंत उपयुक्त आहे.
शिष्यवृत्ती देण्यात येते.

शिक्षण फी व परीक्षा फी देणे :—

विजाभज, इमाव व विमाप्र विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न शा. नि. क्र. विजाभज—२००५/प्र. क्र. ४५/मावक-३ दि. १७-१-२००८ अन्वये रु. १ लाखापेक्षा जास्त व नॉन क्रिमिलेअरच्या आत असणाऱ्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील.

माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या विजाभज/विमाप्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देणे :—

(राज्यातील सर्व जिल्हा परिषदा व फक्त मुंबईसाठी)

(१) माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या विजाभज/विमाप्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करणे
(२) माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या हुशार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्याच्या दृष्टिने मागील वर्षाच्या परिक्षेत ५० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या आणि गुणाक्रमाने पहिला व दुसरा येणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. शिष्यवृत्तीचे दर प्रत्येक विद्यार्थ्यांना खाली दर्शविल्याप्रमाणे आहेत.

इयत्ता ८ वी ते १० वी—दरमहा रु. ४० प्रमाणे (जून ते मार्च, १० महिने)
इयत्ता ५ वी ते ७ वी—दरमहा रु. २० प्रमाणे (जून ते मार्च, १० महिने)

(३) इयत्ता ५ वी ते इयत्ता ७ वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज व विमाप्र वर्गाच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती प्रदान करणे — (राज्यातील सर्व जिल्हा परिषदा व मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा)

विजाभज / विमाप्र मुलींचे प्राथमिक शाळांमधील गळतीचे प्रमाण रोखण्याच्या दृष्टीकोनातून इ. ५ वी ते इ. ७ वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज/विमाप्र मुलींना शिष्यवृत्ती सुरू करण्यात आली आहे. या शिष्यवृत्तीचे दर खालीलप्रमाणे आहेत.

इयत्ता ५ वी ते इयत्ता ७ वी—दरमहा रु. ६०/– (जून ते मार्च, १० महिने).

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विजाभज / विमाप्र विद्यार्थ्यांना विद्यावेतन देणे —

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विजाभज / विमाप्र विद्यार्थ्यांना या योजनेखाली विद्यावेतन देण्यात येते. विजाभज / विमाप्र विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण योजनेनुसार दरमहा रुपये ४० याप्रमाणे विद्यावेतन देण्यात येते तसेच तंत्रशिक्षण विभागाकडून दरमहा रु. ६० याप्रमाणे विद्यावेतन दिले जाते.

विजाभज/इमाव व विमाप्र विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्त्या देणे —

शालांत परीक्षोत्तर शिक्षणासाठी राज्य सरकारने पुरस्कृत केलेली विजाभज / विमाप्र मुला-मुलींना शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्त्या देणे या नावाची एक योजना आहे, विजाभज / विमाप्र मुला-मुलींना बहुतेक सर्व खर्च देण्याचा या योजनेचा उद्देश आहे, ज्या विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांचे, पालकांचे वार्षिक उत्पन्न शा. नि. क्र.–विजाभ–२००५/प्र. क्र. ३७/मावक–३, दिनांक २१–१–२००८ अन्वये रुपये १ लाखापेक्षा जास्त नाही असे विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र समजले जातात. अनिवासी मुला-मुलींचा निर्वाह भत्ता दरमहा रुपये ९० ते १९० पर्यंत दिला जातो. वसतिगृहामध्ये राहणाऱ्या मुला-मुलींसाठी हा दर दरमहा रुपये १५० ते ४२५ पर्यंत दिला जातो. ही योजना भारत सरकारने नेमून दिलेल्या तत्त्वाप्रमाणे राबविली जाते.

भारत सरकार या सवलती विमुक्त जाती आणि भटक्या जमातीच्या तसेच विशेष मागासप्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना देत नाही म्हणून राज्य शासनाने या योजनेचा फायदा ह्या तीन संवर्गातील विद्यार्थ्यांना लागू केला आहे व त्यावरील खर्च संपूर्णपणे राज्य शासनाच्या निधीमधून करण्यात येतो.

भारत सरकारने इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती सन १९९८-९९ पासून योजना चालू केलेली आहे. ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यातील इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २००३-२००४ पासून लागू केलेली आहे. यासाठी उत्पन्न मर्यादा विहित रु. १·०० (लक्ष) पेक्षा कमी असलेल्यासाठी विहित आहे. वर नमूद दराने निर्वाह भत्ता व शिक्षण फी, परीक्षा फीचा समावेश आहे.

विमुक्त जाती आणि भटक्या जमाती यांच्यासाठी स्वेच्छा संस्थांमार्फत आश्रमशाळा उघडणे, त्यांची व्यवस्था व विकास करणे —

विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या भटकंती, विकट आर्थिक स्थिती यामुळे हे लोक त्यांच्या मुलांना शाळेमध्ये पाठवून शिक्षण देऊ शकत नाहीत. ह्या त्यांच्या भटक्या जीवनापासून त्यांना परावृत्त करण्याच्या उद्देशाने स्वेच्छा संस्थांना आश्रमशाळा उघडणे आणि त्यांची व्यवस्था पाहणे यासाठी आर्थिक सहाय्य देण्यात येते.

**सैनिकी शाळेत शिक्षण घेणाऱ्या विजाभज/विमाप्र विद्यार्थ्यांना विशेष निर्वाह भत्ता देणे —**

सैनिक शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विजाभज/विमाप्र विद्यार्थ्यांना सैनिकी शाळेने लागू केलेल्या संपूर्ण खर्चासाठी विशेष निर्वाह भत्ता मंजूर करण्यात येतो. ज्या विद्यार्थ्यांच्या आई/वडिलांचे, पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये १ लाखापेक्षा जास्त नाही, अशा विद्यार्थ्यांना या योजने अंतर्गत लाभ मिळतो. मिळणारे सहाय्य संस्थेला परस्पर देण्यात येते. सन २००३-२००४ या आर्थिक वर्षापासून रु. १५,००० वार्षिक सुधारित दराने निर्वाह भत्ता लाभार्थ्यांना दिला जातो.

**विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या मुला-मुलींसाठी विद्यानिकेतन (पब्लिक स्कूल) सुरू करणे —**

महाराष्ट्र शासन समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग, मुंबई, शासन निर्णय व्हीएएस १०९०/प्र. क्र. १३५/भाग—२, दिनांक ३१—७—१९९६ अन्वये राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील गुणवंत व होतकरू विद्यार्थ्यांसाठी राज्यात स्वयंसेवी संस्थेस मान्य बाबींवर अनुदान देऊन स्वतंत्र असे एक विद्यानिकेतन (पब्लिक स्कूल) नांदेड जिल्ह्यात सुरू करण्यात आले आहे. या विद्यानिकेतन (पब्लिक स्कूल) मध्ये इ. ५ वी ते १२ वी पर्यंत हुशार विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

**ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदान —**

शासन निर्णय क्रमांक ऊसतोड-१०९५-प्र. क्र. १७७/मावक-६, दिनांक ७ मार्च १९९६ अन्वये शासनाने निवासी शाळांना मंजुरी दिलेली आहे. राज्यातील ऊसतोड कामागारांच्या मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये व ते शिक्षणापासून वंचित राहू नये व त्यांना शिक्षण, भोजन, निवास एकच छताखाली देणे याअंतर्गत बीड जिल्ह्यात २ ठिकाणी परळी वैजनाथ व केज येथे ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी प्राथमिक व माध्यमिक शाळांना येथील निवासी विद्यार्थ्यांस मोफत निवास, भोजन व शिक्षण देणयात येते. त्याचप्रमाणे बिछाना साहित्य, क्रमिक पुस्तके, वह्या, शालेय साहित्य व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

**इयत्ता ५ वी ते ७ वी व इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गातील मुलींकरीता सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती —**

शासन निर्णय क्रमांक-१०९४/३२०३८/प्र. क्र. ९०/मावक-२, दिनांक १ जानेवारी १९९६ अन्वये विजाभज प्रवर्गातील विद्यार्थीनींकरीता व दिनांक २९ ऑक्टोबर १९९६ पासून विशेष मागास प्रवर्गातील इ. ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या मुलींकरीता दरमहा रु. ६०० इतका शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यात येतो.

शासन निर्णय क्रमांक इमाव-२००३/प्र. क्र. २०१/मावक-३, दिनांक २५ जुलै २००३ अन्वये विजाभज व विमाप्र प्रवर्गातील मुलींचे शिक्षणाचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे. मुलींना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी व प्रोत्साहन मिळावे, याकरिता सदर योजना राबविण्यात येते. यानुसार इयत्ता ८ वी १० वी मधील प्रत्येक विद्यार्थीनीस दरमहा रुपये १०० प्रमाणे दहा महिन्यांसाठी रुपये १,००० इतका शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यात येतो.

शासन निर्णय क्र. शिवृत्ती २०१८/प्र. क्र. २८३/शिक्षण दिनांक ३० जानेवारी २०१९ अन्वये इतर मागास प्रवर्गातील मुलींकरीता सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे.

**इयत्ता ११ वी ते १२ वी च्या विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षि छत्रपती शाहू महाराज गुणवत्तापूर्ण शिष्यवृत्ती —**

राज्यातील विजाभज/ विमाप्र मुला-मुलींचा शैक्षणिक दर्जा सुधारावा व त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ व्हवी व तसेच सर्वसाधारण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्पर्धेत टिकून रहावेत म्हणून शासनाने इ. १० वी परिक्षेत ७५% पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या व ११ वी मध्ये प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांना सन २००३-२००४ पासून सदरची योजना शासन निर्णय क्रमांक इमाव-२००३/प्र. क्र. २०४/मावक-३, दिनांक २५ जुलै २००३ अन्वये लागू केलेली आहे. यानुसार विजाभज व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दरमहा रुपये ३०० प्रमाणे दहा महिन्यांसाठी रुपये ३,००० इतका योजनेचा लाभ देण्यात येतो.

**विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागासप्रवर्ग यांच्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण —**

विजाभज व विमाप्र संवर्गातील बेरोजगार/अल्पशिक्षीत उमेदवारांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या प्रशिक्षण सुविधांचा व साधन सामुग्रीचा यथयोग्य वापर करून अल्प कालावधीचे प्रशिक्षण देऊन या प्रशिक्षीत उमेदवारांना स्वयंरोजगार मिळावा, या हेतूने शासन निर्णय क्र. इमाव २००३/प्र.क्र.-२०८/मावक-३/दि. २५ जुलै २००३ अन्वये सन २००३-०४ पासून योजना लागू केलेली आहे.

**विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना दिवंगत वसंतराव नाईक गुणवत्ता बक्षीस योजना —**

विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देवून त्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी उद्युक्त करणे यासाठी शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१३/प्र.क्र. ६५/विजाभज-१ दिनांक ४ मार्च २०१७ नुसार इयत्ता १० वी १२ वी च्या परिक्षेत राज्यात व बोर्डात प्रथम येणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थी व विद्यार्थीनींना स्व. वसंतराव नाईक गुणवत्ता पुरस्कार देवून गौरविण्याची योजना शासनाने सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून सुरू केलेली आहे.

**विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती —**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ११ जून २००३ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. सदर योजना विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी नसल्यामुळे सदर प्रवर्गातील गुणवंत मुला-मुलींना परदेशातील नामांकित शिक्षण विद्यापीठामधील उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागता आहे. सदर बाब विचारात घेऊन शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ पासून सदर योजना राबविण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

**ओबीसी, इबीसी व डी. एन. टी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती (कें. पु. यो.) —**

केंद्र शासनाने या योजनेचे धोरण सन २०२२-२३ या वर्षापासून बदलले असून या योजनेकरिता केंद्र हिस्सा ६०% व राज्य हिस्सा ४०% असा बदल करण्यात आला आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने सदरहू धोरण स्वीकारण्यासाठी मा. मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरू असून "ओबीसी, ईबीसी व डिएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती" या योजनेकरिता नवीन लेखाशिर्ष घेण्यात आली आहेत. त्यामधील केंद्र हिस्सा करिता २२२५ एफ ७३७ अंतर्गत रुपये १५.०० कोटी व राज्य हिस्सा करिता २२२५ एफ ७४६ अंतर्गत रुपये १०.०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

**ओबीसी, इबीसी व डी. एन. टी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (कें. पु. यो.) —**

केंद्र शासनाने या योजनेचे धोरण सन २०२२-२३ या वर्षापासून बदलले असून या योजनेकरिता केंद्र हिस्सा ६०% व राज्य हिस्सा ४०% असा बदल करण्यात आला आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने सदरहू धोरण स्वीकारण्यासाठी मा. मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरू असून "ओबीसी, ईबीसी व डिएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती" या योजनेकरिता नवीन लेखाशिर्ष घेण्यात आली आहेत. त्यामधील केंद्र हिस्सा करिता २२२५ एफ ७५५ अंतर्गत रुपये ९७.५० कोटी व राज्य हिस्सा करिता २२२५ एफ ७६४ अंतर्गत रुपये ६५.०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

(२) सामाजिक व इतर सामुहिक योजना —

(१) विजाभज व विमाप्र यांच्यासाठी वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना —

शासन निर्णय, सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक इमाव-२००३/प्र.क्र.२०५/मावक-३, दिनांक ०७ जून, २००३ अन्वये वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना राबविण्यात येते. तसेच शासन निर्णय दिनांक ३० जानेवारी, २०१८ अन्वये सदरहू योजना सुधारित करून राबविण्यात येत आहे. राज्यातील लमाण, वंजारा, वंजारी, धनगर, पारधी अशा समूहांच्या तांडे/वस्त्यांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे, एका जागी स्थैर्य निर्माण करून त्यांना स्थिर जीवन जगता यावे व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणने हा सदरहू योजनेचा मुख्य उद्देश आहे.

(२) विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या करीता यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना —

शासन निर्णय, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, क्रमांक गृनियो-२०१७/प्र.क्र.६०/विजाभज-१, दिनांक २४ जानेवारी, २०१८ अन्वये विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गातील कुटुंबांसाठी ही योजना राबविण्यात येते. सदर प्रवर्गातील कुटुंबांचे राहणीमान उंचावणे, त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढून त्यांना स्थिरता प्राप्त व्हावी तसेच त्यांना विकासाच्या मूळ प्रवाहात येता यावे याकरीता सहाय्य करणे, हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.

(३) मोदी आवास घरकुल योजना —

प्रधानमंत्री आवास योजनेच्या धर्तीवर राज्यात ग्रामीण भागात वास्तव्यास असणाऱ्या इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील पात्र कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी "मोदी आवास घरकुल योजना" राबविण्यास दिनांक २८/७/२०२३, दिनांक २७/९/२०२३ व दिनांक ३०/१/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(४) कन्यादान योजनेअंतर्गत नवविवाहीत दांपत्यांना वित्तीय सहाय्य —

सामुहिक विवाह सोहळ्यामध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील दांपत्यांसाठी कन्यादान योजना लागू करण्यात आलेली आहे. सामुहिक विवाह सोहळ्यामध्ये भाग घेणाऱ्या मागासवर्गीय दांपत्यांना वस्तुरुपात देण्यात येणाऱ्या अनुदानाकरीता रु. २०,०००/- इतकी रक्कम वधूचे वडील, आई किंवा पालकांना धनादेशाद्वारे लग्नाच्या दिवशी देण्यात येते. तर सामुहिक विवाह सोहळा आयोजित करणाऱ्या पात्र स्वयंसेवी संस्थांना प्रती जोडप्यामागे रु. ४,०००/- प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात येते. सदरची योजना सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून राबविण्यात येणार आहे.

(५) महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिवा पुरस्कार —

विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाचा शासन निर्णय संकीर्ण २०१७/प्रक्र २८/विजाभज-१ दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये वीरशैव-लिंगायत समाजाचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकास होण्यासाठी सामाजिक, कलात्मक, समाजप्रबोधनकार व समाजसेवक आणि त्यासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिवर्षी वैशाख शुद्ध (अक्षय तृतीया) या दिवशी त्यांच्या नावाने एक व्यक्ती व एक संस्थेला "महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिवा पुरस्कार" देऊन सन्मानित करण्यात येईल. पुरस्कार विजेत्यास रोख बक्षिस (१) व्यक्तीसाठी रु. २५,०००/- (२) संस्थेसाठी रु. ५१,०००/-

धनगर समाजासाठीच्या योजना

(१) भटक्या जमाती-क या प्रवर्गातील धनगर समाजातील बेरोजगार युवक-युवतींना लष्करातील सैनिक भरती व राज्यातील पोलिस भरतीसाठी आवश्यक ते प्रशिक्षण देणे.

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.०४/विजाभज-१ दिनांक ०६ सप्टेंबर, २०१९ अन्वये, भटक्या जमाती-क या प्रवर्गातील धनगर समाजातील युवक-युवतींमध्ये सैन्य व पोलिस भरतीसाठी प्रशिक्षणाचा अभाव असल्यामुळे बऱ्याच वेळेस व सक्षम असताना देखिल संधी मिळत नसल्याने सैनिक भरती व राज्यातील पोलिस भरतीसाठी पुर्व प्रशिक्षण देण्यासाठी योजना सुरू करण्यात आलेली आहे.

**(२) धनगर समाज बांधवांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम भटक्या जमाती-क मधील धनगर समाजातील बेरोजगार युवक युवतींना स्पर्धा परिक्षेसाठी शुल्कात आर्थिक सवलती लागू करण्याबाबत.**

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.०६/विजाभज-१ दिनांक ०६ सप्टेंबर, २०१९ अन्वये, भटक्या जमाती-क या प्रवर्गातील धनगर समाजातील युवक-युवती यांनी पदवी अभ्यासक्रम किमान ६० टक्के गुणासह उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना MPSC स्पर्धा परिक्षेत बसण्यासाठी परिक्षा शुल्कात आर्थिक सवलत देण्यासाठी योजना सुरू करण्यात आलेली आहे.

**(३) भटक्या जमाती-क मधील धनगर समाजासाठी आवश्यक असलेल्या परंतु अर्थसंकल्पीत निधी उपलब्ध नसलेल्या योजना / कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट)**

शासन निर्णय क्रमांक न्युबयो-२०१९/प्र.क्र.२४/अर्थसं, दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ अन्वये, आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीसाठी सुरू असलेल्या योजनांच्या धर्तीवर धनगर समाज बांधवांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविण्याच्या अनुषंगाने, महाराष्ट्र राज्यात निरनिराळ्या क्षेत्रात राहणाऱ्या "भटक्या जमाती-क मधील धनगर समाजासाठी आवश्यक असलेल्या परंतु अर्थसंकल्पीत निधी उपलब्ध नसलेल्या योजना/कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) ही योजना राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

**(४) भटक्या जमाती-क मधील धनगर समाजातील विद्यार्थ्यांना संघ लोकसेवा आयोग/महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या स्पर्धा पूर्व परिक्षांसाठी निवासी प्रशिक्षण देणेबाबत.**

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.०६/विजाभज-१ दिनांक ०६ सप्टेंबर, २०१९ अन्वये, भटक्या जमाती-क या प्रवर्गातील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी पदवी अभ्यासक्रम किमान ६० टक्के गुणासह उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना संघ लोकसेवा आयोग तसेच राज्य लोकसेवा आयोग यांच्या मार्फत घेण्यात येत असलेल्या स्पर्धा परिक्षेत भाग घेणाऱ्या युवक व युवतींना यशस्वीपणे सामोरे जाण्यासाठी आवश्यक ती पुर्व तयारी करणे, परिक्षा देण्यासाठी आवश्यक असणारे अभ्यास साहित्य व इतर अनुषंगिक सुविधा उपलब्ध करून देणे तसेच यासाठी आवश्यक ते मुलभूत निवासी प्रशिक्षण देण्यासाठी महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) या संस्थेच्या माध्यमातून ही योजना राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

**(५) धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याबाबत.**

शासन निर्णय क्रमांक शिवृत्ती-२०१८/प्र.क्र.७२/शिक्षण, दिनांक ०४/०९/२०१९, क्र. शिवृत्ती-२०१८/ प्र.क्र. ७२/ शिक्षण, दि. ४/९/२०१९ नुसार सदरची योजना कार्यान्वीत करण्यात आली. सन २०१९-२० च्या चालू शैक्षणिक वर्षापासून प्रवेश मिळवून देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही पार पाडावी, सदर शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेवून त्या जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांच्याकडून प्राप्त झालेल्या शाळांची प्रस्तावाची छाननी करून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह जिल्ह्यातील शाळाचे प्रस्ताव संचालक विजाभज इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय पुणे यांचेकडे अग्रेषित करण्यासाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर योजना सन २०१९-२० पासून राबविण्यात येत आहे.

**(६) वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना आदिवासी विकास विभागाच्या स्वयंम योजनेच्या धर्तीवर स्वतंत्र योजना सुरू करणे.**

शासन निर्णय क्रमांक धवगृ-२०१९/प्र.क्र.१२६/मावक/दिनांक ६ सप्टेंबर, २०१९ नुसार वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी आदिवासी विकास विभागाच्या स्वयंम योजनेच्या धर्तीवर स्वतंत्र योजना सुरू करण्यात आलेली आहे. सन २०१९-२० या वर्षापासून इयत्ता १२ वी नंतरच्या मान्यताप्राप्त तंत्र शिक्षण तसेच व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयामध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेल्या परंतु शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी योजना लागू करण्यात आलेली आहे.

**(७) केंद्र शासनाच्या स्टॅंड अप इंडिया अप इंडिया योजनेत धनगर समाजातील महिलांकरिता मार्जिन मनी उपलब्ध करून देणेबाबत.**

शासन निर्णय क्रमांक धवयो-२०१९/प्र.क्र.०५/विजाभज-१ दिनांक ०६ सप्टेंबर, २०१९ अन्वये, केंद्र शासनाच्या स्टॅंड अप इंडिया या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील धनगर समाजातील महिलांकरिताच्या सवलतीस पात्र नवउद्योजक महिला लाभार्थ्यांची मार्जिन मनी भरण्याची क्षमता नसल्यामुळे या नवउद्योजक महिला लाभार्थ्यांना एकूण प्रकल्प किंमतीच्या लाभार्थी यांच्या हिश्श्यामधील २५ टक्के मधील जास्तीत जास्त १५ टक्के मार्जिन मनी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

**(८) धनगर समाज बांधवाच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजासाठी घरे बांधण्याची योजना.**

शासन निर्णय क्रमांक गृनियो-२०१९/प्र.क्र.०२/विजाभज-१ दिनांक ०६ सप्टेंबर, २०१९ अन्वये सदरहू योजना लागू करण्यात आलेली आहे. राज्यातील भटक्या जमाती-क प्रवर्गातील ग्रामीण भागातील धनगर समाजातील लोकांकरीता १०,००० वैयक्तिक लाभार्थी यांचेसाठी घरकुले बांधण्याची योजना आहे.

**(९) धनगर समाज बांधवाच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राज्याच्या महसूली विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी भटक्या जमाती-क (धनगर) प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेण्याऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह निर्माण करणे.**

शासन निर्णय क्रमांक धवयो-२०१९/प्र.क्र.०५/विजाभज-१ दिनांक ०६ सप्टेंबर, २०१९ अन्वये, भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील लोकांचा सर्वांगीन विकास व्हावा त्यांचा मुलांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे याकरीता भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या लोकांसाठी राज्यात महसूली विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह निर्माण करण्याची योजना सुरू करण्यात आलेली आहे.

## (३) आर्थिक उन्नती

### (अ) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म.) मुंबई

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाची स्थापना कंपनी कायदा १९५६ नुसार, दिनांक ८ फेब्रुवारी, १९८४ रोजी झाली आहे. ११५ विमुक्त जाती व भटक्या जमातीतील दारिद्र्यरेषेखाली जीवनमान जगणाऱ्या लोकांना त्यांचा आर्थिक विकास करण्याच्या दृष्टीने त्यांना त्यांचे उद्योग व्यवसाय सुरू करण्याकरीता ४% नाममात्र व्याजदराने कर्ज पुरवठा करण्यासाठी ना-नफा-ना-तोटा या तत्वावर या महामंडळाची स्थापना केलेली आहे. महामंडळामार्फत वितरीत होणाऱ्या कर्जावर आकारण्यात येणाऱ्या ४% व्याजाव्यतिरीक्त महामंडळास उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नाही. शासन निर्णय दिनांक १३ जुलै १९९९ नुसार महामंडळास विशेष मागास प्रवर्गातील लाभार्थींना कर्ज पुरवठा करण्याकरीता प्राधिकृत वाहिनी (Authorized Agency) म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु. २००·०० कोटी आहे. महामंडळाच्या स्थापनेपासून सन २०२२-२३ या वित्तीय वर्षापर्यंत रु. १९९·३५ कोटी भागभांडवल प्राप्त झालेले आहे. मागील पाच वर्षात शासनाने खालीलप्रमाणे महामंडळास भागभांडवल मंजूर करुन वितरीत केले आहे.

(रुपये लाखांत)

| वर्ष | मंजूर तरतूद | वितरीत भाग भांडवल | कर्ज वाटप | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| २०१९-२० | ००·०० | निरंक | निरंक | निरंक |
| २०२०-२१ | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| २०२१-२२ | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| २०२२-२३ | ६५·०० | ५२·०० | निरंक | निरंक |
| २०२३-२४ | ६५·०० | निरंक | निरंक | निरंक |

बीज भांडवल कर्ज योजनेअंतर्गत सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक अंदाज पत्रकानुसार निधीची खालीलप्रमाणे आवश्यकता असून लेखाशिर्ष ४२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग ०३ मागासवर्गाचे कल्याण, १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका (०१) भाग भांडवली अंशदान (०१) (०१) वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (आणि विशेष मागास प्रवर्गासाठी योजना) (कार्यक्रम) (४२२५-१९२२) ५४ गुंतवणूका या शिर्षाखाली खालीलप्रमाणे अर्थसंकल्पात तरतूद करण्याची विनंती करण्यात आली आहे.

(रुपये लाखांत)

| प्रस्तावित खर्चाच्या बाबी | | सन २०२४-२०२५ चे वार्षिक अंदाजपत्रक |
|---|---|---|
| (१) | | (२) |
| बीज भांडवल २५ : ७५ | | |
| (१) २५ : ७५ कर्ज योजनेअंतर्गत रु. ५·०० लाखापर्यंत ४०० कर्ज प्रकरणांकरीता (महामंडळाचा सहभाग) | | ५०००·०० |
| (२) रु. १,००,००० थेट कर्ज योजनेअंतर्गत ५२०० कर्ज प्रकरणांकरीता | | ५२,०००·०० |
| वरील मंजूर योजनांकरीता एकूण आवश्यक तरतूद | एकूण | ५७,०००·०० |

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व गट कर्ज व्याज परतावा योजना :

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा महामंडळाने सन २०१९-२० पासून कार्यान्वित केले असून सदर वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेअंतर्गत व्याजाचा परतावा माहे-जानेवारी २०२३ पर्यंतची माहिती.

(रुपये लाखांत)

| वर्ष | मंजूर तरतूद | वितरीत सहाय्यक अनुदान | व्याज परतावा | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| २०२०-२१ | निरंक | निरंक | ०·४७ | १ |
| २०२१-२२ | १,००,०००·०० | १,००,०००·०० | ९·२४ | १८ |
| २०२२-२३ | १,००,०००·०० | ४९००·०० | ४३·७८ | ९३ |
| २०२३-२४ | ४,७५०·०० | निरंक | १०·६३ | ९९ |

**रु. १.०० लाख थेट कर्ज योजना :-**

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या थेट कर्ज योजनेअंतर्गत राज्य शासनाने दि. १४/०२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये कर्जाची मर्यादा रु. २५,०००/- वरुन रु. १,००,०००/- करण्यात आली आहे.

महामंडळामार्फत रु. १.०० लाख थेट कर्ज योजनेअंतर्गत माहे - मार्च, २०२४ पर्यंत कर्ज वाटप करण्यात आलेली माहिती..

| वर्ष | एकूण मंजूर तरतुद | वितरीत भाग भांडवल | लाभार्थी संख्या | वाटप रक्कम (रु. कोटीत) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| २०२२-२३ | ०० | ०० | ५१७ | ५·१७ |
| २०२३-२४ | ०० | ०० | १,१७४ | ११·७४ |

## वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई.
## महाराष्ट्र शासन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना

उत्पन्न मर्यादा : शहरी व ग्रामीण भागाकरिता रु. १.०० लाख

**(१) बीज भांडवल कर्ज योजना.**

| अ. क्र. | योजनेचे नाव | प्रकल्प मर्यादा | बँकेचा सहभाग | महामंडळाचा सहभाग | व्याज दर | परतफेडीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १. | बीज भांडवल कर्ज योजना | रू. ५.०० लाख | ७५% | २५% | ४% | ५ वर्षे |

या योजने अंतर्गत महामंडळ सुशिक्षित बेरोजगार व दुर्बल घटकांतील जीवनमान जगणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील लोकांना त्यांच्या प्रस्तावित उद्योग व्यवसायाकरीता बीज भांडवल २५% कर्ज ४% व्याज दराने महामंडळाचा सहभाग व ७५% कर्ज बँकेचा सहभाग असे एकुण १००% कर्ज रक्कम वितरीत करण्यात येते. सदर कर्ज प्रकरणाकरीता सक्षम अधिकारी यांचा जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रेशनकार्ड, व्यवसायाच्या अनुषंगाने कोटेशन, प्रकल्प अहवाल, स्थानिक रहिवासी दाखला, नागरीकत्व दाखला, दोन फोटो, महिलांकरीता विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नगरपालिका/ग्रामपंचायत ना हरकत दाखला, व्यवसायाचा परवाना, शाळा सोडल्याचा दाखला/वयाचा पुरावा, आधारकार्ड/पॅनकार्ड/निवडणुक ओळखपत्र, बँक पासबुक झेरॉक्स इ. कागदपत्रांची आवश्यकता असते. लाभार्थीकडून कर्ज प्रकरण प्राप्त झाल्यानंतर शासन आदेशानुसार स्थापन करण्यात आलेल्या लाभार्थी निवड समितीकडून सदर कर्ज प्रकरण मंजुरी घेऊन तसेच दोन सक्षम शासकीय जामीनदार रु. १००/- च्या मुद्रांक पेपरवर नोटरीकरून कर्जाबाबत हमी पत्र लिहून घेण्यात येते तसेच त्यांचेकडील कार्यालयीन ओळखपत्र, वेतनपत्र, रेशनकार्ड, आधारकार्ड, पॅनकार्ड, विद्युत विल, फोटो, इ. आवश्यक कागदपत्र घेण्यात येतात. वैधानिक दस्तऐवजांची पूर्तता करून घेतल्यानंतर लाभार्थींना कर्ज वितरण केले जाते. या योजनेअंतर्गत रु. ५०,०००/- ते रु. ५.०० लाख प्रकल्प मर्यादेपर्यंत लाभार्थ्यांना कर्ज मंजुर करण्यात येते. लाभार्थ्यांना कोणत्याही प्रकारचा माल/वस्तूंची खरेदी करून देण्यात येत नाही.

**(२) रु. १,००,०००/- थेट कर्ज योजना :-**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | थेट कर्ज योजना | रू. १,००,०००/- | – | १००% | बीन व्याजी | ४ वर्ष |

या योजने अंतर्गत महामंडळ सुशिक्षित बेरोजगार व दुर्बल घटकांतील जीवनमान जगणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील लोकांना त्यांच्या प्रस्तावित उद्योग व्यवसायाकरीता रु. १,००,००० थेट कर्ज योजनेअंतर्गत १००% कर्ज वितरीत करण्यात येते. सदर कर्ज प्रकरणाकरीता सक्षम अधिकारी यांचा जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रेशनकार्ड, व्यवसायाच्या अनुषंगाने कोटेशन, स्थानिक रहिवासी दाखला, नागरीकत्व दाखला, दोन फोटो, महिलांकरीता विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नगरपालिका/ग्रामपंचायत ना हरकत दाखला, व्यवसायाचा परवाना, शाळा सोडल्याचा दाखला/वयाचा पुरावा, आधारकार्ड/पॅनकार्ड/निवडणुक ओळखपत्र, बँक पासबुक झेरॉक्स इ. कागदपत्रांची आवश्यकता असते. लाभार्थीकडून कर्ज प्रकरण प्राप्त झाल्यानंतर शासन आदेशानुसार स्थापन करण्यात आलेल्या लाभार्थी निवड समितीकडून सदर कर्ज प्रकरण मंजुरी घेऊन तसेच दोन सक्षम शासकीय जामीनदार रु. १००/- च्या मुद्रांक पेपरवर नोटरीकरून कर्जाबाबत हमी पत्र लिहून घेण्यात येते तसेच त्यांचेकडील कार्यालयीन ओळखपत्र, वेतनपत्र, रेशनकार्ड, आधारकार्ड, पॅनकार्ड, विद्युत विल, फोटो, इ. आवश्यक कागदपत्र घेण्यात येतात. वैधानिक दस्तऐवजांची पूर्तता करून घेतल्यानंतर लाभार्थींना कर्ज वितरण केले जाते. या योजनेअंतर्गत रु. १,००,०००/- प्रकल्प मर्यादेचे कर्ज मंजुर करण्यात येते. लाभार्थ्यांना कोणत्याही प्रकारचा माल/वस्तूंची खरेदी करून देण्यात येत नाही.

**३. कर्ज व्याज परतावा योजना**

(अ) वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना- शासन निर्णय क्र. इमाव २०१९/प्रक्र ११/महामंडळे दिनांक २८ जानेवारी २०१९ अन्वये अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या धर्तीवर रु. १०.०० लाखापर्यंतच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा ही नवीन योजना वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित) यांचेमार्फत राबविण्यास शासनाने मान्यता दिली असून सदर योजना सन २०१९-२० पासून राबविण्यात आली असून या योजनांची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे :-

**वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (IR-1)**

(शासन निर्णय :- विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र. इमाव २०१९ प्र. क्र. ११/महामंडळे, दिनांक २८ जानेवारी, २०१९.)

**वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेची मर्यादा :- रु. १०.०० लाखा पर्यंत.**

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेच्या पात्रतेसाठी उत्पन्न मर्यादा.

सदर योजनेकरीता लाभार्थ्यांचे कौटूंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा, नॉन क्रिमिलेअर करीता असलेल्या कौटुंबिक उत्पन्न रु. ८.०० लाखाच्या (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाण पत्रानुसार) असावे.

प्रकल्प क्षेत्रानुसार लक्ष्यांक अंदाजपत्रक :-

| | | |
|---|---|---|
| १. | कृषी, संलग्न व पारंपारिक उपक्रमांसाठी | एकूण आर्थिक तरतूदीच्या ६०% |
| २. | लघु व मध्यम उद्योगांसाठी<br>(अ) उत्पादन (ब) व्यापार व विक्री | (२) व (३) साठी एकूण आर्थिक तरतूदीच्या ४०% रक्कम |
| ३. | सेवा क्षेत्रासाठी | |

अर्थसहाय्य मिळविण्यासाठी आवश्यक पात्रता :-

(१) अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

(२) अर्जदार विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील असावा.

(३) अर्जदाराचे वय वर्ष १८ ते ५० दरम्यान असावे.

(४) अर्जदाराचे कर्ज खाते आधारकार्ड लिंक असणे अनिवार्य राहील.

(५) वेबपोर्टल/महामंडळाच्या संगणक प्रणालीवर नाव नोंदणी अनिवार्य राहील.

(६) अर्जदार कोणत्याही बँकेचा अथवा/वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.

(७) अर्जदाराने अर्ज करतेवेळी या प्रकल्पासाठी व यापुर्वी महामंडळाच्या किंवा इतर महामंडळाच्या कोणत्याही योजनाचा लाभ घेतलेला नसावा.

(८) अर्जदाराने कर्ज प्रकरण हे सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) आणि तत्सम संगणक प्रणालीद्वारे प्रकरण हाताळण्यास सक्षम असलेल्या बँकेत केलेले असावे.

(९) कुटुंबातील एकावेळी एकाच सदस्याला कर्ज योजनेचा लाभ घेता येईल.

परताव्याच्या अटी :-

(१) जर लाभार्थ्याने मध्येच नियमित कर्ज परतफेड नाही केली तर व्याज परतावा दिला जाणार नाही.

(२) लाभार्थ्याने ऑनलाईन पोर्टलवर उद्योग सुरू असल्याचे किमान दोन फोटो अपलोड करावेत.

महामंडळामार्फत लाभार्थ्यांस कर्जाच्या व्याज रकमेचा परतावा :-

उमेदवाराने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम (१२ टक्केच्या मर्यादेत) त्याचा आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. सदर योजना पुर्णपणे संगणकीकृत असून प्रक्रीया सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येईल.

महामंडळ केवळ बँकेने वेळेत वसूल केलेली योग्य व्याज रक्कम अदा करेल, या ऐवजी इतर कोणतेही Charges/Fees अदा करणार नाही.

**अर्जदारांची नाव नोंदणी :-**

अर्जदारांनी शासनाच्या/महामंडळाच्या अधिकृत वेब पोर्टलवर अर्ज सादर करणे बंधनकारक असेल. प्रस्ताव सादर केल्यावर दिलेल्या अटी व शर्तीनुसार प्रस्ताव पात्र ठरत असल्यास अर्जदारास संगणीकृत सशर्त हेतुपत्र (Letter of Intent) मंजुरीपत्र दिले जाईल. उमेदवाराने या आधारे बँकेकडून प्रकरणावर कर्ज मंजूर करून घ्यावे.

**योजनेचे सर्वसाधारण नियंत्रण :-**

(अ) दरवर्षी महामंडळामार्फत केले जाईल.

(आ) महामंडळाचे जिल्हा स्तरावरील योजनेच्या अंमलबजावणीचे काम आवश्यकतेनुसार मुख्यालयातील व्यवस्थापकीय संचालक, महाव्यवस्थापक, उपमहाव्यवस्थापक व इतर वरिष्ठ अधिकारी हे वेळोवेळी भेट देऊन तपासतील.

**अर्जदारांनी या योजनेसाठी vjnt.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावा.**

(ब) गट कर्ज व्याज परतावा योजना - शासन निर्णय क्र. इमाव २०१९/प्र.क्र. १२/महामंडळे दिनांक २८ जानेवारी २०१९ अन्वये अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंळळाच्या धर्तीवर रु. १०.०० लाख ते रु. ५०.०० लाखापर्यंतच्या गट कर्ज व्याज परतावा ही नवीन योजना वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित) यांचेमार्फत राबविण्यास शासनाने मान्यता दिली असून सदर योजना सन २०१९-२० पासुन राबविण्यात आली असून या योजनांची माहिती सविस्तर खालीलप्रमाणे.

**गट प्रकल्प कर्ज व्याज परतावा योजना (IR-2)**

(शासन निर्णय :- विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र. इमाव २०१९/प्र. क्र. १२/ महामंडळे, दिनांक २८ जानेवारी, २०१९)

**गट प्रकल्प कर्ज व्याज परतावा योजनेची प्रकल्प मर्यादा :**

**वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेची मर्यादा :- रु. १०.०० लाख ते रु. ५०.०० लाख.**

**प्रकल्प क्षेत्रानुसार लक्ष्यांक अंदाजपत्रक :-**

| | | |
|---|---|---|
| १. | कृषी, संलग्न व पारंपारिक उपक्रमांसाठी | एकूण आर्थिक तरतूदीच्या ६०% रक्कम |
| २. | लघु व मध्यम उद्योगांसाठी<br>(अ) उत्पादन (ब) व्यापार व विक्री | (२) व (३) साठी एकूण आर्थिक तरतूदीच्या ४०% रक्कम |
| ३. | सेवा क्षेत्रासाठी | |

**अर्थसहाय्य मिळविण्यासाठी आवश्यक पात्रता :-**

(१) गटातील सदस्य हे महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत.

(२) गटातील सदस्य हे विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील असावेत.

(३) गटातील लाभार्थ्यांचे कर्ज खाते आधारकार्ड लिंक असणे अनिवार्य राहील.

(४) गटातील लाभार्थ्यांचे वय वर्ष १८ ते ४५ दरम्यान असावे.

(५) गटातील सर्व सदस्यांचे महामंडळाच्या वेबपोर्टल/महामंडळाच्या संगणक प्रणालीवर नाव नोंदणी अनिवार्य राहील.

(६) गटातील सर्व लाभार्थ्यांचे प्रमाणित वार्षिक कौटुंबिक उत्पन्न, नॉन क्रिमिलेअर करीता असलेल्या कौटुंबिक उत्पन्न रु. ८.०० लाखाच्या मर्यादित (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाण पत्रानुसार) असावे.

इतर अटी व शर्ती

१. खालील प्रकारचे गट या योजनेअंतर्गत पात्र असतील.

(अ) शासन मान्य वचत गट (इतर कोणत्याही शासकीय योजनेत मान्य असलेले)

(ब) भागिदारी संस्था (निबंधक, महाराष्ट्र राज्य, भागिदारी संस्था, मुंबई यांनी प्राधिकृत केलेले)

(क) सहकारी संस्था (जिल्हा उपनिबंधक यांनी प्राधिकृत केलेले)

(ड) कंपनी/Limited Liability Partnership (LLP)/Society (कंपनी कायदा, २०१३ च्या Web Portal नुसार)

२. गटातील उमेदवाराने अर्ज करतेवळी या प्रकल्पासाठी व यापुर्वी महामंडळाच्या वा इतर महामंडळाच्या कोणत्याही योजनाचा लाभ घेतलेला नसावा.

३. गटाने कर्ज प्रकरण हे सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) या अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे प्रकरण हाताळण्यास सक्षम असलेल्या बँकेत केलेले असावे.

४. गटातील उमेदवाराने/व्यक्तीने या महामंडळाच्या व इतर महामंडळाच्या गट किंवा वैयक्तिक योजनांचा लाभ घेतलेला नसावा.

५. ही योजना सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या व्यवसायाच्या विस्तारासाठी व योजनेची अंमलबजावणी केल्यानंतर स्थापन झालेल्या नवीन उद्योगांसाठी असेल.

६. गटाच्या भागीदाराने किमान रु. ५०० कोटीच्या वर ठेवी असलेल्या व कोअर बँकींग सिस्टम असलेल्या राष्ट्रीयकृत/शेड्युल्ड बँकेत खाते असावे.

७. गटातील सर्व सदस्यांचा सिविल क्रेडीट स्कोअर किमान ५०० इतका असावा.

गटांची नाव नोंदणी

गटातील सर्व सदस्यांचे महामंडळाच्या अधिकृत वेबपोर्टलवर अर्ज सादर करणे बंधनकारक असेल. प्रस्ताव सादर केल्यावर दिलेल्या अटी व शर्तीनुसार प्रस्ताव पात्र ठरत असल्यास गटास संगणीकृत सशर्त हेतुपत्र (Letter of Intent)/मंजुरीपत्र दिले जाईल. गटाने या आधारे बँकेकडून प्रकरणांवर कर्ज मंजुर करून घ्यावे.

महामंडळामार्फत गटाच्या कर्जाच्या व्याज रक्कमेचा परतावा

गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम (१२ टक्केच्या मर्यादेत अथवा रु. १५.०० लाखाच्या मर्यादेत) त्याचा आधार लिंक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. सदर योजना पुर्णपणे संगणकीकृत असून प्रक्रीया सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (एमएसपीएफ) या अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येईल.

महामंडळ केवळ बँकेने वेळेत वसूल केलेली योग्य व्याज रक्कम अदा करेल, या ऐवजी इतर कोणतेही Charges/Fees अदा करणार नाही.

योजनेचे सर्वसाधारण नियंत्रण :-

(अ) दरवर्षी महामंडळामार्फत केले जाईल.

(आ) महामंडळाचे जिल्हा स्तरावरील कामकाज महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक मुख्यालयाच्या मार्गदर्शनाखाली पाहतील.

**गटाने या योजनेसाठी vjnt.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावा :-**

## (ब) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई

महामंडळाची स्थापना —

महाराष्ट्र राज्यातील ओ. बी. सी. (इतर मागासवर्ग) प्रवर्गाच्या उन्नतीसाठी व त्यांना स्वयंरोजगारासाठी अल्प व्याज दराने वित्त सहाय्य उपलब्ध करून देणे शक्य व्हावे, यासाठी शासनाने दिनांक २५-९-१९९८ रोजी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची स्थापना केली आहे. या महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रु. २५०·०० कोटी व वितरीत भागभांडवल रु. १७०.५५ कोटी आहे.

शासनाकडून प्राप्त भागभांडवल रकमेतून महामंडळ राज्य महामंडळाची २०% बीज भांडवल, थेट कर्ज योजना, सहाय्यक अनुदानातुन वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना, कौशल्य विकास प्रशिक्षण योजना व महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना राबविते. महामंडळ राबवित असलेल्या योजनांची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे.

१. राज्य महामंडळाची योजना —

(अ) राज्य महामंडळाची २०% बीज भांडवल योजना

महामंडळ ही योजना राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हा अग्रणी बँका व सर्व राष्ट्रीयकृत बँकांच्या माध्यमातून राबविते. या योजनेमध्ये रु. ५.०० लक्ष पर्यंत प्रकल्प किमतीच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात येते. त्यामध्ये महामंडळाचा सहभाग २०%, लाभार्थ्यांचा सहभाग ५% व बँकेचा सहभाग ७५% असतो. महामंडळाच्या रकमेवर व्याजाचा दर ६% असून बँकेच्या रकमेवर बँकेच्या दराने व्याज आकारण्यात येते. परतफेडीचा कालावधी ५ वर्षे आहे.

(ब) राज्य महामंडळाची सुधारीत थेट कर्ज योजना —

शासन निर्णय क्र.- मंत्रिम २०१९/प्र.क्र. १०/महामंडळे दि. २८/०१/२०१९ च्या शासन निर्णयान्वये महामंडळास सुधारीत थेट कर्ज योजनेस मंजुरी दिली आहे. सुधारीत योजनेमध्ये रु. १,००,०००/- प्रकल्प किंमतीच्या प्रस्तावांना मंजूरी देण्यात येते. नियमित कर्ज परत फेड करणाऱ्या लाभार्थींना सदर योजनेंतर्गत व्याज आकारण्यात येणार नाही.

(क) वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (व्याज अनुदान योजना) —

शासन निर्णय क्र.- मंत्रिम २०१९/प्र.क्र. ११/महामंडळे दि. २८/०१/२०१९ च्या शासन निर्णयान्वये महामंडळास अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या धर्तीवर समकक्ष रु. १०·०० लक्ष पर्यंतच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा ही नवीन योजना महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ व शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग विकास महामंडळामार्फत राबविण्यास शासनाने मान्यता दिली असून सदर योजना सन वित्तिय वर्ष २०१९-२० पासून राज्यभर ऑनलाईन राबविण्यात येत आहे.

(ड) गट कर्ज व्याज परतावा योजना (व्याज अनुदान योजना) —

शासन निर्णय क्र.- मंत्रिम २०१९/प्र.क्र. १२/महामंडळे दि. २८/०१/२०१९ च्या शासन निर्णयान्वये महामंडळास अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या धर्तीवर रु. १०·०० लक्ष ते रु. ५०·०० लक्ष पर्यंतच्या समकक्ष गट कर्ज व्याज परतावा ही नवीन योजना महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळ व शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग विकास महामंडळामार्फत राबविण्यास शासनाने मान्यता दिली असून सदर योजना सन वित्तीय वर्ष २०१९-२० पासून राज्यभर राबविण्यात येत आहे.

(इ) शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना (व्याज अनुदान योजना)

शासन निर्णय क्र.- मंत्रिम २०२१/प्र.क्र. २३/महामंडळे दि. ०६/१२/२०२१ अन्वये इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थी/विद्यार्थीनीकरीता शैक्षणिक कर्ज व्याज परतावा ही नवीन योजना महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ व शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यास शासनाने मान्यता दिली असुन सदर योजना सन वित्तिय वर्ष २०२२-२३ पासुन राज्यभर राबविण्यात येत आहे.

(फ) कौशल्य विकास प्रशिक्षण योजना

शासन निर्णय क्र.- मंत्रिम २०२१/प्र.क्र. ७८/महामंडळे दि. २१/०२/२०२२ अन्वये युवक-युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याकरीता ही नवीन योजना महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ व शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यास शासनाने मान्यता दिली असुन सदर योजना सन वित्तिय वर्ष २०२२-२३ पासुन राज्यभर राबविण्यात येत आहे.

(ग) महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना (व्याज अनुदान योजना)

शासन निर्णय क्र.- मंत्रिम २०१८/प्र.क्र. १०८/महामंडळे दि. ०७/०६/२०२२ अन्वये बचत गटांतील इतर मागास प्रवर्गातील महिलांकरीता महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना ही नवीन योजना महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ व शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग विकास महामंडळामार्फत राबविण्यास शासनाने मान्यता दिली असून सदर योजना सन वित्तिय वर्ष २०२२-२३ पासून राज्यभर राबविण्यात येत आहे.

२. राज्य महामंडळाच्या योजनेकरिता लाभार्थीची अर्हता :—

१. अर्जदार इतर मागासवर्गीय प्रवर्गातील असावा.

२. अर्जदार महाराष्ट्राचा सर्वसाधारण रहिवासी असावा.

३. (अ) २०% बीजभांडवल व वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेकरिता अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे असावे.

(ब) थेट कर्ज योजनेकरिता अर्जदाराचे वय १८ ते ५५ वर्षे व गट कर्ज व्याज परतावा योजनेत अर्जदाराचे व सर्व सभासदांचे वय १८ ते ४५ वर्षे असावे.

४. अर्जदार कोणत्याही बँकेचा, महामंडळाचा किंवा वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.

५. (अ) राज्य महामंडळाच्या योजनेकरीता शहरी तसेच ग्रामीण भागातील अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रु. १,००,०००/- पेक्षा जास्त नसावे.

(ब) वैयक्तिक कर्ज व्याज परतावा व गट कर्ज व्याज परतावा अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रु. ८,००,०००/- पेक्षा जास्त नसावे.

६. कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल.

७. अर्जदाराने जो व्यवसाय निवडला असेल, त्या व्यवसायाचे त्याला ज्ञान किंवा अनुभव असावा.

८. कर्जाच्या इतर अटी व शर्ती महामंडळ ठरवेल त्याप्रमाणे राहतील.

९. राज्य महामंडळाच्या सुधारीत थेट कर्ज योजना व गट कर्ज व्याज परतावा योजना करीता अर्जदाराचा व गटातील सर्व सभासदांचा सिबिल क्रेडिट स्कोअर किमान ५०० इतका असावा.

३. अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांचा तपशील :—

१. सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या उत्पन्नाचा दाखला.

२. जातीचे प्रमाणपत्र, शिधापत्रिकेची प्रमाणित प्रत, पासपोर्ट साईज फोटो.

३. व्यवसाय स्थळाची भाडे पावती, करारनामा, ७/१२ उतारा.

४. अर्जदाराच्या शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र/जन्म तारखेचा दाखला.

५ २ जामीनदारांची प्रमाणपत्रे व संमतीपत्र.

६. स्थानिक स्वराज्य संस्थेचे व्यवसाय करण्याबाबत "ना हरकत प्रमाणपत्र" तसेच अर्जदाराला ज्या प्रयोजनासाठी कर्ज मंजूर होणार आहे त्या प्रयोजनासाठी त्याचा उपयोग करण्याबाबतचे अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र.

७. तांत्रिक व्यवसायासाठी जे परवाना/लायसन्स आवश्यक असतील असे परवाने लायसन्स.

८. व्यवसायाचा प्रकल्प अहवाल, या अहवालासोबत लागणारा कच्चा माल, यंत्र सामुग्री इत्यादीबाबतचे दरपत्रक.

९. अर्जदाराने मूळ प्रमाणपत्र न जोडता त्याच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात.

४. महामंडळाच्या कामकाजाचा अहवाल—

(अ) महामंडळाची २०% बीजभांडवल योजना

या योजनेंतर्गत महामंडळाने सुरुवातीपासून माहे मार्च, २०२४ पर्यंत १०,५२६ लाभार्थींना रु. २७·९२ इतकी रक्कम वितरित केली आहे.

(ब) महामंडळाची थेट कर्ज योजना

थेट कर्ज योजना महामंडळाने सन २०१५-१६ पासून कार्यान्वित केले असून सदर योजनेअंतर्गत माहे मार्च, २०२४ पर्यंत एकूण ३२०० लाभार्थींना रु. १४·३० कोटी इतके कर्ज वितरीत केले आहे.

(क) महामंडळाची वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (व्याज अनुदान योजना)

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (व्याज अनुदान योजना) महामंडळाने सन २०२०-२०२१ पासून कार्यान्वित केले असून सदर योजनेंतर्गत माहे मार्च, २०२४ पर्यंत एकूण ९९६ लाभार्थींना रु. ३.९६ कोटी इतके कर्ज वितरीत केले आहे.

(ड) महामंडळाची शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना (व्याज अनुदान योजना)

महामंडळाने शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना सन २०२२-२३ पासून कार्यान्वित केले असून सदर योजनेंतर्गत माहे मार्च, २०२४ पर्यंत एकूण १८ लाभार्थींना रु. ०.०३ कोटी इतके व्याज परताव्याची रक्कम वितरित केले आहे.

(इ) कौशल्य विकास प्रशिक्षण योजना (अनुदान योजना)

महामंडळाने कौशल्य विकास प्रशिक्षण योजनेअंतर्गत सन २०२२-२३ पासून कार्यान्वित केले असून सदर योजनेंतर्गत माहे मार्च, २०२४ पर्यंत एकूण १६५० लाभार्थींना रु. ०.६७ कोटी इतकी रक्कम संबंधित प्रशिक्षण संस्थांना अदा करण्यात आली आहे.

(ई) राष्ट्रीय महामंडळाच्या योजनांतर्गत कर्ज वितरण

राष्ट्रीय महामंडळाच्या सर्व योजनांतर्गत महामंडळाने सुरूवातीपासून माहे मार्च, २०२४ पर्यंत २२,१९९ लाभार्थींना रु. १४८.१५ कोटी इतकी रक्कम वितरीत केली आहे.

(५) सन २०२३-२४ या वर्षामध्ये माहे मार्च, २०२४ पर्यंत महामंडळाने राज्य व राष्ट्रीय महामंडळाच्या योजनांमध्ये कर्ज मंजूर व वितरीत रक्कम यांची माहिती खालीलप्रमाणे :

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | योजना | कर्ज मंजूर रक्कम | | कर्ज वितरण | |
|---|---|---|---|---|---|
| | | लाभार्थी | रक्कम | लाभार्थी | रक्कम |
| १. | २० टक्के बीज भांडवल योजना | २ | ०.००९ | २ | ०.००९ |
| १. | थेट कर्ज योजना | ११८६ | ११.८६ | २३५ | २.०५ |
| १. | * वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (व्याज अनुदान योजना) | * | * | ६४७ | २.६१ |
| १. | * शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना (व्याज अनुदान योजना) | * | * | १८ | ०.०३ |
| १. | कौशल्य विकास प्रशिक्षण योजना (प्रशिक्षण योजना) | ५९१० | १०.९५ | १६५० | ०.६७ |
| | एकूण | ७०९८ | २२.८१९ | २५५२ | ५.३६९ |

वैयक्तिक व शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजनेंतर्गत लाभार्थींना बँकेने कर्ज मंजुरी दिलेल्या व नियमित परतफेड केलेल्या लाभार्थींना व्याज परतावा रक्कम अदा करण्यात आली आहे.

महामंडळाची प्रशासकीय संरचना

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे मुख्यालय प्रशासकीय भवन, ४ था मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई-४०००७१ येथे असून जिल्हा स्तरावर स्वतंत्र कार्यालय असून जिल्हा व्यवस्थापक, लेखापाल व वसुली निरिक्षक अशी तीन पदे कार्यरत आहेत.

## (क) महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे
## (सांकेतांक क्रमांक-२२२५ एफ ३५२)

आयोगाची रचना खालील प्रमाणे

(१) अध्यक्ष-१ पद (मा. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त किंवा उच्च न्यायालयाचे न्यायाधिश आहेत किंवा निवृत्त न्यायाधिश)

(२) सदस्य-९ पदे (प्रत्येक महसूल विभागातून किमान एक तसेच किमान एक महिला)

खालील संवर्गातील अधिकारी पदसिद्ध सदस्य सचिव असतात

(१) सहसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य पेक्षा कमी दर्जाचा नसेल व जो राज्य शासनाचा अधिकारी आहे किंवा होता अशा अधिकाऱ्याचे सदस्य सचिव पदावर नामनिर्देशन करता येईल.

आयोगाच्या कामकाजाकरीता खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारीवृंद कार्यरत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | सुधारित वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर. | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| (१) | सदस्य सचिव | S-25 : ७८८००-२०९२०० | ०१ | ०१ | ०० |
| (२) | संशोधन अधिकारी | S-18 : ४९१००-१५५८०० | ०१ | ०१ | ०० |
| (३) | कार्यालय अधीक्षक | S-14 : ३८६००-१२२८०० | ०१ | ०० | ०१ |
| (४) | उच्चश्रेणी लघुलेखक | S-15 : ४१८००-१३२३०० | ०२ | ०१ | ०१ |
| (५) | कनिष्ठ लिपिक | S-06 : १९९००-६३२०० | ०२ | ०२ | ०० |
| (६) | शिपाई | S-01 : १५०००-४७६०० | ०१ | ०१ | ०० |
| | | एकूण... | ०८ | ०६ | ०२ |

आयोगाची कर्तव्य खालीलप्रमाणे

१. महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार आयोगाची कर्तव्ये निश्चित केलेली आहेत. एखाद्या जाती समुहाची नोंद महाराष्ट्र राज्याच्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती वगळून) यामध्ये समावेश करणे अथवा वगळणे या संबंधी प्राप्त झालेल्या तक्रारी/मागण्या बाबत शासनास अभ्यासपुर्ण शिफारस करणे ही आयोगाची कार्यकक्षा आहे.

२. नागरीकांचा मागासवर्ग निश्चित करण्याचे निकष आणि पद्धती यासंबंधी नियतकालिक आढावा घेवून त्याबाबत राज्य शासनाकडे शिफारस करणे.

३. नागरीकांच्या मागासवर्गाच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीचा नियमीतपणे आढावा घेणे.

४. नागरिकांच्या विविध वर्गाच्या बदलत्या सामाजिक व आर्थिक दर्जाविषयीची आधार सामग्री तयार करणे.

५. विहीत करण्यात येतील अशी इतर कामे.

उपरोक्त कामे पार पाडीत असताना राज्य मागासवर्ग आयोगास, दिवाणी न्यायालयास असतात, ते सर्व अधिकार असतील अशी तरतूद कलम १० मध्ये करण्यात आलेली आहे.

मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी प्रत्यक्षपणे कोणतीही आर्थिक योजना आयोगाकडून राबविली जात नाही. तथापी "२२२५-एफ-३५२-मागासवर्ग आयोग" या लेखाशिर्ष सांकेताखाली सन २०२३-२४ या वर्षाकरिता सदर आयोगातील अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन, अध्यक्ष व सदस्य यांचे मानधन, दुरध्वनी खर्च, प्रवास खर्च आणि इतर कार्यालयीन खर्च इत्यादीसाठी रु. ३६१·९२२४ कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आला असून सन २०२४-२५ करिता रु. २·४० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाकरिता खालीलप्रमाणे अर्थसंकल्पिय तरतुद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | बाब | लेखाशिर्ष/उपशिर्ष | प्राप्त तरतुद (रुपयात) |
|---|---|---|---|
| १ | वेतन | २२२५-एफ-३५२-(०१) | ९७२००० |
| २ | वीज व दुरध्वनी | २२२५-एफ-३५२-(०६) | ७२००० |
| ३ | कंत्राटी सेवा | २२२५-एफ-३५२-(१०) | ९०००००० |
| ४ | प्रवास खर्च | २२२५-एफ-३५२-(११) | १५४४००० |
| ५ | कार्यालयीन खर्च | २२२५-एफ-३५२-(१३) | ४४१०००० |
| ६ | व्यावसायिक सेवा | २२२५-एफ-३५२-(२८) | १००० |
| ७ | इतर खर्च | २२२५-एफ-३५२-(५०) | १०००० |
| | | एकूण.. | २४००९००० |

## (ड) महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती)

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग तसेच इतर वंचित आणि दुर्लक्षित घटकांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाच्या अनुषंगाने संशोधन व अभ्यास करणे तसेच त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी विद्यार्थी, युवक-युवतींसाठी विविध उपक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या संस्थेच्या धर्तीवर एक स्वायत्त संस्था स्थापन करण्याची आवश्यकता होती. त्यासाठी मा. मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्याची घोषणा सन २०१९ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये दोन्ही सभागृहात मा. मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांनी निवेदनाद्वारे केली होती. त्यानुसार दि. ६ जुलै २०१९ च्या शासन निर्णयान्वये मा. मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने दि. २९/०७/२०१९ रोजी मा. मुख्यमंत्री यांना अहवाल सादर केला व सदर अहवाल मा. मुख्यमंत्री महोदयांनी स्वीकृत केला.

सदर अहवालाच्या आधारे विमुक्त जाती. भटक्या जमाती. इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग त्याचप्रमाणे इतर वंचित आणि दुर्लक्षित घटक यांच्या सामाजिक. शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी, आधुनिक भारताचे सामाजिक व शैक्षणिक क्रांतीचे जनक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या नावाने पुणे येथे महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) Mahatma Jyotiba Phule Research and Training Institute (MAHA JYOTI) या नावाची स्वायत्त संस्था स्थापन करण्यास मान्यता देण्यासाठी व सदरहू संस्थेची कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत नियम ८ अन्वये नोंदणी करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव दिनांक ३० जुलै, २०१९ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. त्यास, मंत्रीमंडळाने मान्यता दिली. त्यानुसार शासन निर्णय क्र संकीर्ण २०१९/प्र.क्र.१११/मावक, दिनांक ८ ऑगस्ट, २०१९ अन्वये "महाज्योती" ही संस्था स्थापन करण्यात आली. तसेच, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र.१११/मावक, दिनांक ९ ऑगस्ट २०१९ अन्वये महाज्योतीचे प्रथम संचालक व शासनाचे प्रतिनिधी यांस मान्यता देण्यात आली. त्यानंतर शासन निर्णय क्र. सारथी २०१९/प्र.क्र.१०५/महामंडळे, दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ अन्वये महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (महाज्योती) मेमोरंडम ऑफ असोसिएशन (Memorandum of Association) व आर्टिकल्स ऑफ असोशिएशन (Articles of Association) ला शासन मान्यता देण्यात आली आहे. तद्नंतर दिनांक २२ ऑक्टोबर, २०१९ रोजी कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ८ अंतर्गत सदर संस्थेची नोंदणी करण्यात आली आहे. महाज्योती या संस्थेचे मुख्यालय "पुणे" ऐवजी "नागपूर" येथे स्थापन करण्यास दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

## (ई) महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)

बार्टी, सारथी आणि महाज्योती या संस्थांच्या धर्तीवर खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक-युवती व इतर उमेदवारांसाठी विविध उपक्रम, कार्यक्रम इ. राबविण्यात येऊन व इतर माध्यमातूनही विद्यार्थी, युवक-युवती, इत्यादींचा विकास घडविण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी Academy of Maharashtra Reseach, Upliftment and Training (AMRUT) (अमृत) या नावाने नवीन स्वायत्त संस्था स्थापन करण्याचा प्रस्ताव दिनांक २० ऑगस्ट २०१९ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार अमृत या नावाने नवीन स्वायत्त संस्था स्थापन करण्यास दिनांक २२ ऑगस्ट २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर संस्थेचे मुख्यालय नाशिक येथे ठेवण्याबाबत दिनांक १७ सप्टेबर २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर संस्थेची स्थापना करण्याकरिता सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट (Society Registration Act 1860) आणि सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम (Public Trust Act 1950) अंतर्गत नोंदणी करण्याकरिता सदर संस्थेचे कार्यकारी मंडळ व कार्यकारी समिती दिनांक ६ जानेवारी २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आले आहे.

# इतर मागास वर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागासप्रवर्ग यांचे कल्याण

(एक) प्रस्तावनात्मक :

शासनाकडून इमाव सावशैमाप्र, विजाभज आणि विमाप्र यांच्या कल्याणाकरिता राबविल्या जाणाऱ्या योजनांचा प्रामुख्याने खालील तीन विभागांत समावेश केला आहे. त्या योजना अनुक्रमे (१) शैक्षणिक, (२) आर्थिक उन्नती, (३) सामाजिक व इतर सामुहिक योजना. शैक्षणिक योजनेमध्ये फी शुल्क, परीक्षा फी, शिष्यवृत्त्या, भारत सरकार शालान्त परीक्षोत्तर शिष्यवृत्ती, शासकीय वसतिगृहे व स्वयंस्फूर्त संस्थांना वसतिगृहे तसेच आश्रम शाळा व मूलोद्योगोत्तर आश्रम शाळा चालविण्यासाठी मदत; इमारत अनुदान वगैरे योजनांचा समावेश आहे. यात शैक्षणिक सवलती हा एकूण योजनांतील महत्त्वाचा भाग आहे.

## योजनेची संक्षिप्त माहिती

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | राज्य सरकारची शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना (विजाभज) (विजाभज विद्यार्थ्यांसाठी). (२२२५-०७७१) नवीन लेखाशीर्ष (२२२५-ई८८४) | २०१८—२०१९ | ४,१७,७७,९० | ४,१७,७६,६४ | ३३,०९,८२ | सदर योजना विजाभज या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लागू केलेली आहे. या योजनेसाठी महाराष्ट्र शासनाकडून तरतूद उपलब्ध करून देण्यात येते. योजनेचे उद्दिष्ट व स्वरूप : मागासवर्गीय विद्यार्थी शालांत परिक्षोत्तर शिक्षण घेणेस उद्युक्त व्हावे त्यांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने इयत्ता अकरावी-पासून ते पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती शिक्षण फी, परीक्षा फी व इतर अनुज्ञेय फी संबंधित विद्यार्थ्यांना निवासी व अनिवासी दराने अदा केली जाते. योजनेच्या अटी व शर्ती : (१) विद्यार्थ्यांच्या पालकांचे सर्वमार्गांनी मिळून होणारे वार्षिक उत्पन्न रुपये १ लाखापर्यंत आहे अशा पाल्यास शिष्यवृत्ती दिली जाते. ( शा. नि., क्र. विजाभज २००५/प्र. क्र. ३७/मावक-३/ दि. २१–१–२००८) (२) पूर्णकालीन नोकरी करणारे विद्यार्थी या शिष्यवृत्तीस अपात्र आहेत. (३) त्याच इयत्तेत परत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही. ते उत्तीर्ण झाल्यावर वरच्या वर्गासाठी शिष्यवृत्ती मिळण्यास ते पात्र होतील. लाभाचे स्वरूप : पात्र विद्यार्थ्यास विद्यापीठाने मान्य केलेली शिक्षण फी, परीक्षा फी व इतर अनुज्ञेय फी संबंधित महाविद्यालयास परस्पर अदा केली जाते. वसतिगृहात न रहाता शिक्षण घेणाऱ्या पात्र विजाभज विद्यार्थ्यांना दरमहा रुपये ९० ते १९० दराने व निवासी विद्यार्थ्यांसाठी दरमहा रु. १५० ते ४२५ अशी दहा महिन्यांसाठी संबंधित विद्यार्थ्यास निर्वाहभत्ता अदा केला जातो. सन २०१०-२०११ या वर्षापासून ई स्कॉलरशिप योजना लागू केलेली आहे. तसेच सन २०१८-१९ या वर्षामध्ये महाडिबीटी प्रणालीमार्फत मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनांची कार्यवाही सुरू आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीयकृत बँक खात्यात निर्वाह भत्त्याची रक्कम परस्पर जमा करण्यात येते. महाविद्यालयाच्या बँक खात्यात शिक्षण फी, परीक्षा फी जमा करण्यात येते. |
| | | २०१९—२०२० | ५,००,००,०० | ५,५४,२१,५० | १२,१२,५६ | |
| | | २०२०—२०२१ | ४,८४,४८,४६ | ४,३९,१३,९२ | १६,७९,४७ | |
| | | २०२१—२०२२ | — | — | — | |
| | | २०२२—२०२३ | ७,५३,२५,०० | ७,४५,९९,७७ | २६,७३,६६ | |
| | | २०२३—२०२४ | ७,७३,६०,०० | ७,७३,६०,०० | — | |
| २ | विशेष मागास प्रवर्ग विद्यार्थ्यांसाठी शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती व इतर शैक्षणिक सवलती. (२२२५-२५९६) नवीन लेखाशीर्ष (२२२५-ई९४६) | २०१८—२०१९ | १,५०,००,०० | १,४९,९८,७८ | ७,७०,३५ | शिष्यवृत्ती पात्रतेच्या ठळक अटी : (१) विमाप्र या मागास प्रवर्गाच्या ज्या विद्यार्थ्यांच्या वडिलांचे/पालकांचे वार्षिक उत्पन्न (शा. नि., क्र. विजाभज-२००५/ प्र. क्र. ३७/मावक-३, दि. २१–१–२००८) १ लाखापेक्षा अधिक असता कामा नये. पूर्णकालीन नोकरी करणारे विद्यार्थी अपात्र आहेत. (२) त्याच इयत्तेत परत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळू शकणार नाही. पास झाल्यानंतर वरच्या वर्गासाठी शिष्यवृत्तीस ते पात्र ठरतील. (३) फक्त दोनच मुलांना ही शिष्यवृत्ती मिळेल. मुलींच्या बाबतीत ही अट शिथील करण्यात आली आहे. (४) जो विद्यार्थी/विद्यार्थीनी दुसरी शिष्यवृत्ती अगर विद्यावेतन स्वीकारील त्यास ही शिष्यवृत्ती त्या तारखेपासून मिळणार नाही. (५) ज्या संस्थेत विद्यार्थी शिकत आहेत त्या संस्था प्रमुखांकडून पूर्णपणे भरलेले अर्ज विद्यार्थ्यांनी सादर करावेत. विद्यार्थी ज्या राज्याचा रहिवासी असेल त्या राज्य सरकारने या कामासाठी विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यास उद्देशून हे अर्ज करावेत. |
| | | २०१९—२०२० | १,२०,००,०० | १,६३,६९,२५ | ८२,३६ | |
| | | २०२०—२०२१ | १,२०,००,०० | ८४,००,०० | ७०,९३ | |
| | | २०२१—२०२२ | २,२७,०२,३८ | २,२७,०२,३८ | ... | |
| | | २०२२—२०२३ | ३,९०,००,०० | १,८८,३१,०७ | ४,५७,७६ | |
| | | २०२३—२०२४ | १,९८,६५,०० | १,९८,६५,०० | ... | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | विमुक्त जाती, भटक्या जमाती व विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क माफी व परीक्षा शुल्क प्रदान करण्याची योजना . (विजाभज)<br>(२२२५-०८०६)<br>नवीन लेखाशीर्ष<br>(२२२५-ई ९१९) | २०१८–२०१९<br>२०१९–२०२०<br>२०२०–२०२१<br>२०२१–२०२२<br>२०२२–२०२३<br>२०२३–२०२४ | १,२५,००,००<br>१,५०,००,००<br>१,५०,००,००<br>२,४१,१७,४२<br>४,०३,७५,००<br>२,४६,७५,०० | १,२४,९८,७८<br>२,३३७८०४<br>१,५०,००,००<br>२,४१,१७,४२<br>४,०१,१८,४५<br>२,४६,७५,०० | ४,७६,६१<br>२,०३,५६<br>१,४६,३२<br>...<br>४,२८,१०<br>... | विजाभज विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे यासाठी राज्यशासनाने सन २००६-०७ पासून खाजगी विनाअनुदानित व कायम विना अनुदानित शासकीय संस्थामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विजाभज विद्यार्थ्यांसाठी शिक्षण फी, परीक्षा फी प्रतिपूर्ती योजना दिनांक १२ मार्च २००७ च्या शासन निर्णयान्वये सुरू केलेली आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १.०० लाखापेक्षा जास्त व रु. ८.०० लाख या उत्पन्न मर्यादेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर योजने अंतर्गत लाभ देण्यात येतो. त्यानुसार विजाभज विद्यार्थ्यांची १०० टक्के शिक्षण फी परीक्षा फी प्रतिपूर्ती करण्यात येते. |
| ४ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विद्यावेतन प्रदान करण्याची योजना.<br>(विजाभज/विमाप्र)<br>(२२२५-०७९१)<br><br>शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील पीपीपी योजनेत उपलब्ध जागांवर तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये केंद्रिय ऑनलाईन पद्धतीने प्रवेश घेणाऱ्या इमाव, विजाभज आणि विमाप्र विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती करणेबाबत.<br><br>नवीन लेखाशीर्ष<br>(२२२५-ई ९०१) | २०१८–२०१९<br>२०१९–२०२०<br>२०२०–२०२१<br>२०२१–२०२२<br>२०२२–२०२३<br>२०२३–२०२४ | ३५,००<br>१०,००<br>१७,७०<br>५,००<br>४,७५<br>३६,०२,०० | १३,१३<br>३६०<br>...<br>...<br>४,७५<br>३६,०१,९९ | ३२,८२<br>३६०<br>...<br>...<br>५५<br>... | सदरची योजना शासन निर्णय, क्र. ईबीसी–१०७९/५६२४३-डी.आय-०७–०५–१९८३, दिनांक ०७–०५–१९८३ पासून लागू करण्यात आलेली आहे. शासन निर्णय आयटीआय २०१९/प्र.क्र.६८ दिनांक २ ऑगस्ट २०२१ विजाभज विमाप्र विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून तरतूद उपलब्ध करून देण्यात येते.<br>**योजनेचे उद्दिष्ट व स्वरूप :**<br>शासकीय औद्योगिक प्रशिक्षण मधील पीपीपी योजनेंतर्गत उपलब्ध जागांवर तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने प्रवेश घेणाऱ्या इमाव, विजाभज आणि विमाप्र विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती करणेबाबत याद्वारे मान्यता देत आहे. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता. उर्वरित प्रशिक्षण शुल्काच्या ८०% इतक्या रकमेची प्रतिपूर्ती विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहतील.<br>**योजनेच्या अटी व शर्ती-**<br>१. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील पीपीपी योजनेंतर्गत प्रवेशासाठी उपलब्ध जागांसाठी व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये केंद्रीय ऑनलाईन प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणे बंधनकारक राहील.<br>२. विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाच्या दिनांक १६/१२/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये उन्नत व प्रगत गट या करीता नॉनक्रिमिलेयर साठी निश्चित केलेल्या उत्पन्न व प्रगत गट याकरिता नॉन क्रिमीलेअरसाठी निश्चित केलेल्या उत्पन्न मर्यादेनुसार विद्यार्थ्यांच्या पालकांचे एकत्रित उत्पन्न रुपये ८.०० लाखाच्या मर्यादेत असावे.<br>३. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.<br>४. DGT, नवी दिल्ली अथवा MSCVT यांनी मान्यता दिलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाच्या तुकड्याच्या प्रवेशित जागावर प्रवेश घणे बंधनकारक राहील.<br>५. सदर योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यापर्यंत मर्यादित राहिल. |

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ५ | व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या वसतिगृहातील निवासी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता प्रदान करणे. (विजाभज/विमाप्र) (२२२५ २२३७) नवीन लेखाशीर्ष (२२२५-ई-९३७) | २०१८—२०१९<br>२०१९—२०२०<br>२०२०—२०२१<br>२०२१—२०२२<br>२०२२—२०२३<br>२०२३—२०२४<br>(माहे. ऑक्टोबर, २०२३) | २,७९,९५<br>२,३०,००<br>२,५०,००<br>२,५०,००<br>४,७५,००<br>५,००,०० | २,६०,८६<br>२,६१,४५<br>२,५०,००<br>२,४७,११<br>४,४२,६७<br>४,९९,९८ | ५०,८८<br>४६,३६<br>१३,९९<br>२८,६२<br>५६,२४<br>... | सदरची योजना शासनाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी सहाव्यभूत व्हावी म्हणून लागू केलेली आहे. (शा. नि., क्र. इमाव-२००३/प्र. क्र. २०२/मावक-३, दिनांक १८-७-२००३) त्यानुसार निर्वाह भत्त्याचे दर खाली परिशिष्ट 'अ' व 'ब' मध्ये दर्शविण्यात आले आहेत.<br>योजनेचे उद्दिष्ट व स्वरूप : शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा प्रवेशाचा ताण कमी करण्याच्या दृष्टीने वैद्यकीय, अभियांत्रिकी व इतर व्यावसायिक महाविद्यालयांच्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजने अंतर्गत लाभ मिळतो. सदरचा लाभ दहा महिन्यांच्या कालावधीकरिता शिष्यवृत्तीच्या रकमेव्यतिरिक्त दिला जातो.<br>योजनेच्या अटी व शर्ती :— (१) विद्यार्थी हा विजाभज व विमाप्र या प्रवर्गातील असावा. (२) तो भारत सरकार शिष्यवृत्ती धारक असावा. (३) त्याने संबंधित व्यावसायिक पाठ्यक्रमाच्या महाविद्यालयाशी संलग्न असलेल्या वसतिगृहात प्रवेश घेतलेला असावा. (४) विद्यार्थी हा वैद्यकीय, अभियांत्रिकी, पशुधन या अभ्यासक्रमाचा पदवी/पदव्युत्तर शिक्षण नियमित घेणारा असावा.<br>लाभाचे स्वरूप :— या योजनांतर्गत व्यावसायिक पाठ्यक्रमाच्या अभ्यासक्रमाची अ, ब आणि क मध्ये वर्गवारी करण्यात आलेली आहे. यामध्ये व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या वसतिगृहात राहणाऱ्या व वसतिगृहात प्रवेश मिळण्यास पात्र असलेल्या परंतु वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे परिशिष्ट अ व परिशिष्ट ब प्रमाणे निर्वाहभत्ता देण्यात येतो. |

(१) परिशिष्ट 'अ'

सदर योजने अंतर्गत निर्वाह भत्त्याचे दर खालीलप्रमाणे अनुज्ञेय राहतील.

(शासकीय वसतिगृहांत राहणारे)

| अभ्यासक्रमाचे नाव | निर्वाह भत्त्याचा प्रतिमाह दर | कालावधी | एकूण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| अ चार ते पाच वर्षांचे अभ्यासक्रम वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, पशु वैद्यकीय, वास्तुशास्त्र इत्यादी. | रु. ७०० | १० महिने | रु. ७,००० |
| ब दोन ते तीन वर्षांचे अभ्यासक्रम अभियांत्रिकी पदविका, एमबीए, एमएसडब्ल्यू इत्यादी. | रु. ५०० | १० महिने | रु. ५,००० |
| क दोन वर्ष किंवा त्यापेक्षा कमी कालावधीचे अभ्यासक्रम बी.एड., डी. एड. इत्यादी. | रु. ५०० | १० महिने | रु. ५,००० |

### (२) परिशिष्ट 'ब'

व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या वसतिगृहाच्या शा. वसतिगृहाच्या बाहेर राहणाऱ्या परंतु वसतिगृहात प्रवेश मिळण्यास पात्र असणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना.

सदर योजने अंतर्गत निर्वाह भत्त्याचे दर खालीलप्रमाणे अनुज्ञेय राहतील.

| अभ्यासक्रमाचे नाव | निर्वाह भत्त्याचा प्रतिमाह दर | कालावधी | एकूण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| अ चार ते पाच वर्षांचे अभ्यासक्रम वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, पशु वैद्यकीय, वास्तुशास्त्र इत्यादी. | रु. १,००० | १० महिने | रु. १०,००० |
| ब दोन ते तीन वर्षांचे अभ्यासक्रम अभियांत्रिकी पदविका, एमबीए, एम.एस.डब्ल्यू. इत्यादी. | रु. ७०० | १० महिने | रु. ७,००० |
| क दोन वर्ष किंवा त्यापेक्षा कमी कालावधीचे अभ्यासक्रम बी.एड., डी. एड. इत्यादी | रु. ५०० | १० महिने | रु. ५,००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती प्रदान करणे. (राज्य + केंद्र पुरस्कृत) (२२२५-३१४४) (२२२५-३५७४) नवीन लेखाशीर्ष (२२२५-ई ९९१) (२२२५-एफ ००२) नवीन लेखाशीर्ष | २०१८–२०१९ | १२,६१,५९,०० | १२,४४,७९,९० | ९६,७५,८६ | शासन निर्णय क्रमांक इमाव-२००२/प्र. क्र. ४१४/मावक-३, दिनांक २९-५-२००३ अन्वये राज्यातील इमाव विद्यार्थ्यांना केंद्र पुरस्कृत शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती सन २००३–२००४ या शैक्षणिक वर्षापासून तसेच शा. नि., दि. ३१–३–२००४ अन्वये विना अनुदानित महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती लागू करण्यात आलेली आहे. |
| | | २०१९–२०२० | ७,६६,८८,७४ | ५,४८,२८,४२ | ४०,५९,९४ | |
| | | २०२०–२०२१ | ७,५०,००,०० | ३,९०,००,०० | ३१,०१,८८ | |
| | | २०२१–२०२२ | १०,६४,९१,८४ | १०,४९,६३,३३ | ... | |
| | | २०२२–२०२३ | १०,८७,२८,९९ | ८,८७,३७,०७ | ४७,४१,९० | |
| | | २०२३–२०२४ | १०,९३,७७,०० | १०,९३,७७,०० | ... | |

**योजनेचे उद्दिष्ट व स्वरूप :**

इतर मागासवर्गीय विद्यार्थी शालांत परिक्षोत्तर शिक्षण घेण्यास उद्युक्त व्हावे व त्याकरिता त्यांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने इयत्ता ११ वी पासून ते पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परीक्षा फी व इतर अनुज्ञेय फी संबंधित विद्यार्थ्यांना निवासी व अनिवासी दराने अदा केली जाते.

**योजनेच्या अटी व शर्ती :**

(१) विद्यार्थ्यांच्या पालकांचे सर्व मार्गांनी मिळून होणारे वार्षिक आर्थिक उत्पन्न रुपये १·५ लाखापर्यंत असल्यास शिष्यवृत्ती दिली जाते. (शिष्यवृत्ती २०२१/प्र.क्र.२६/शिक्षण, दिनांक २२/०३/२०२१).

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | टीप : केंद्र शासनाने या योजनेचे धोरण सन २०२२-२३ या वर्षापासून बदलले असून या योजनेकरिता केंद्र हिस्सा ६०% व राज्य हिस्सा ४०% असा बदल करण्यात आला आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने सदरहू धोरण स्वीकारण्यासाठी मा. मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरू असून "ओबीसी, ईबीसी व डिएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती" या योजनेकरिता नवीन लेखाशिर्षक घेण्यात आली आहेत. त्यामधील केंद्र हिस्सा करिता २२२५ एफ ७५५ अंतर्गत रुपये ९७.५० कोटी व राज्य हिस्सा करिता २२२५ एफ ७६४ अंतर्गत रुपये ६५.०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. | | | | | (२) पूर्णकालीन नोकरी करणारे विद्यार्थी या शिष्यवृत्तीस अपात्र आहेत. (३) त्याच इयत्तेत परत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही. ते उत्तीर्ण झाल्यावर वरच्या वर्गासाठी शिष्यवृत्ती मिळण्यास ते पात्र होतील.<br><br>**लाभाचे स्वरूप :**<br><br>या योजने अंतर्गत इतर मागास वर्गीयांसाठी लागू करण्यात यावयाच्या अटी व शर्ती केंद्र शासनाने लागू केलेल्या शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती योजने प्रमाणे आहे. प्रथमतः सदरची योजना ही शासन व अनुदानित महाविद्यालयातील इ. मा. व. विद्यार्थ्यांना लागू करण्यात आलेली होती. तथापि शासनाने शासन शुद्धीपत्रक, इमाव २००२/प्र. क्र. ७१४/मावक-३, दिनांक ३१ मार्च २००४ अन्वये सदरची योजना शासन अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयातील इ. मा. व. विद्यार्थ्यांकरिता लागू करण्यात आलेली आहे. |
| ७ | राज्यातील इतर मागास-वर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण फी व परीक्षा फी प्रदाने.<br>(२२२५-३२३३)<br>नवीन लेखाशीर्ष<br>(२२२५-ई ९७३) | २०१८—२०१९<br>२०१९—२०२०<br>२०२०—२०२१<br>२०२१—२०२२<br>२०२२—२०२३<br>२०२३—२०२४ | २,५४,४४,२९<br>२,००,००,००<br>२,५०,००,००<br>३,४९,८६,५८<br>४,२०,००,००<br>२,७१,५३,०० | २,५४,४३,६२<br>३,१२,५०,००<br>१,७५,००,००<br>३,४९,८६,५८<br>४,०७,९१,४४<br>२,७१,५०,५७ | १४,६९,४५<br>७,०९,९९<br>२,१७,१७<br>१०,१५,४६<br>९,७७,२४<br>... | शासन निर्णय क्रमांक इमाव-२००३/प्र. क्र. १०३/मावक-३, दिनांक ६-१०-२००३ अन्वये. लागू करणेत आलेली आहे व शासन निर्णय, इमाव-२००२/प्र. क्र. ४१४/मावक-३, दि. १२ मार्च २००७ अन्वये राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयात शासकीय कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शासनाने विहीत केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक प्रतीपूर्ती योजना लागू केलेली आहे. सदरची योजना ही अभिमत विद्यापीठ व व्यवस्थापन कोटा तसेच डीएड/बीएड अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना लागू नाही.<br><br>**योजनेचे उद्दिष्ट व स्वरूप :**<br><br>विजाभज व विमाप्र प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी सुरू असलेल्या शालांत परिक्षोत्तर (मॅट्रिकोत्तर) शिक्षण फी व परीक्षा फी योजनेच्या धर्तीवर राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शालांत परिक्षोत्तर (मॅट्रिकोत्तर) शिक्षण फी व परीक्षा फी माफीची सवलत योजना सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात आलेली आहे. |

योजनेच्या अटी व शर्ती :

(१) ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रक्कम रुपये १.०० (लक्ष) पेक्षा जास्त व रु. ८.०० (लक्ष) या उत्पन्न मर्यादित असेल अशा पालकांच्या पाल्यांना शिक्षण फी व परीक्षा फी सवलत लागू राहील. दि. १२ मार्च २००७ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील खाजगी मान्यताप्राप्त विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी (बीएड व डीएड कोर्स वगळून) विजाभज व विमाप्र वर्गाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समिती, प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क व इतर शुल्काची प्रतिपूर्ती करण्यास तसेच इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांना प्रस्तावित शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्काच्या ५०% दराने प्रतिपूर्ती देण्यात येईल.

लाभाचे स्वरूप :

पात्र विद्यार्थ्यास विद्यापीठाने शिक्षण शुल्क समितीने मान्य केलेली शिक्षण फी, परीक्षा फी व इतर अनुज्ञेय फी शासनाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे संबंधित महाविद्यालयात परस्पर अदा केली जाते. संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत अर्ज सादर करावा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | सैनिकी शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यां-साठी निर्वाहभत्ता (विजाभज/विमाप्र). (२२२५-०८१५) (२२२५-०८६२) नवीन लेखाशीर्ष (२२२५-ई९२८) | २०१८–२०१९ | ३,००,०० | २,९८,५५ | १९,९० | समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक बीसी-१०७४/५६४२-३ का. ५, दिनांक ६-८-१९७६ अन्वये सदरची योजना सुरू करण्यात आली आहे. याच धर्तीवर शासनाने शासन निर्णय, क्र. संकीर्ण-२००२/प्र. क्र. ३७१/मावक-३, दि. ५-८-२००३ अन्वये विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना सन २००३–२००४ या शैक्षणिक वर्षापासून लागू केलेली आहे. या योजने अंतर्गत निर्वाह भत्त्याच्या दरामध्ये शासनाने दिनांक १-९-२००४ अन्वये निर्वाह भत्त्यामध्ये वाढ केलेली आहे. पुणे, सातारा व नाशिक या शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रचलित दराने आकारण्यात येणारी पूर्ण खर्चाची रक्कम देण्यात येते. तसेच स्वयंसेवी संस्थे- मार्फत चालविण्यात येणाऱ्या सैनिक शाळांमध्ये शिक्षण घेण्याकरिता निर्धारित केलेल्या वार्षिक भत्त्याची रक्कम रु. १५,००० प्रमाणे प्रती विद्यार्थी संबंधित संस्थेस अदा करण्यास मंजुरी दिलेली आहे. |
| | | २०१९–२०२० | २,००,०० | १,१७,३३ | ७८,२२ | |
| | | २०२०–२०२१ | २,००,०० | निरंक | निरंक | |
| | | २०२१–२०२२ | ४,६३,०६ | ४,६३,०५ | ३०,८७ | |
| | | २०२२–२०२३ | ३,००,०० | १,४८,१९ | ... | |
| | | २०२३–२०२४ | ३,००,०० | २,९९,८६ | | |

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | **योजनेचे उद्दिष्ट व स्वरूप :**<br>मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी सैनिकी शाळेत प्रशिक्षण घेऊन भारतीय सेनादलामध्ये प्रवेश घेण्यासाठी उद्युक्त व्हावे यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. या योजने अंतर्गत पुणे, नाशिक व सातारा येथील शासकीय सैनिक शाळेतील तसेच इतर शासनमान्य सैनिक शाळेतील विजाभज व विमाप्र विद्यार्थ्यांना मान्य दराने निर्वाह भत्ता अदा केला जातो.<br>**योजनेच्या अटी व शर्ती :** (१) विद्यार्थी हा ५ वी ते १० वी पर्यंतच्या वर्गात शिकणारा असावा. (२) त्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १ लाखापर्यंत असावे. (३) तो विजाभज व विमाप्र प्रवर्गातील असावा.<br>**लाभाचे स्वरूप :**<br>या योजने अंतर्गत नाशिक, पुणे, सातारा येथील सैनिक शाळेमध्ये शिकणाऱ्या विजाभज, विमाप्रच्या विद्यार्थ्यांना शिक्षण फी, परीक्षा फी, भोजन, निवास, कपडे, क्रीडा, घोडेस्वारी व पॉकेटमनी इत्यादीवरील खर्चाची प्रतिपूर्ती संबंधित शाळांना करण्यात येते तर १९९६–९७ पासून स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या सैनिक शाळांतील विद्यार्थ्यांना रुपये १५,००० पर्यंतचा खर्च शासनामार्फत अदा केला जातो. |
| ९ | स्वयंसेवी संस्थांना आश्रमशाळा व मुलोद्योगोत्तर आश्रम-शाळा चालविण्यासाठी सहाय्यक अनुदाने.<br>(२२२५-०७५३)<br>(२२२५-०७६२)<br>नवीन लेखाशीर्ष<br>(२२२५-ई-८६६) | २०१८–२०१९<br>२०१९–२०२०<br>२०२०–२०२१<br>२०२१–२०२२<br>२०२२–२०२३<br>२०२३–२०२४ | ८४,००,००<br>९,४५,४६,५६<br>११,२१,००,००<br>१७,५१,६३,७९<br>१०,७५,७०,००<br>१४,७७,२७,३९ | ७,३४,४७,२७<br>९,३९,५२,९१<br>१०,२७,०८,१५<br>१०,५१,६३,७९<br>१३,०५,७५,१४<br>१४,६६,६८,९० | ९,७२ शाळा<br>९,७२ शाळा<br>९,७२ शाळा<br>९,७२ शाळा<br>९,७२ शाळा<br>९७२ | शासन निर्णय : शिक्षण विभाग, क्रमांक १६५३-मुंबई, दिनांक २२-१२-१९५३ व क्रमांक वीसीपी-१०७४/५३७५५ दिनांक २६-६-१९७५ अन्वये सदरची योजना शिक्षण विभागाकडून समाजकल्याण संचालनालयाकडे वर्ग करण्यात आली. शा. नि. दि. २६-६-२००८ अन्वये शासनाने माध्यमिक आश्रम शाळेस जोडून १४८ कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यास सन २००८-२००९ पासून मंजुरी दिली आहे.<br>योजनेचे उद्दिष्ट व स्वरूप :<br>शासन निर्णय २६-६-०८ अन्वये शासनाने माध्यमिक आश्रमशाळेस सोडून १२५ कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यास सन २००८-२००९ पासून मंजुरी दिली आहे. तसेच सन २००९-१० पासून २३ कनिष्ठ महाविद्यालयांना ३१ ऑगस्ट २००९ अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे. असे एकूण १४८ कनिष्ठ महाविद्यालयांना मंजुरी दिली आहे. विजाभज प्रवर्गातील मुलांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध होण्यासाठी व त्यांच्यामध्ये शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत प्राथमिक व माध्यमिक निवासी शाळा सुरू करून त्यांना आर्थिक सहाय्य देणे. आजमितीस राज्यात ५२६ प्राथमिक व २९८ माध्यमिक, १४८ कनिष्ठ महाविद्यालये कार्यरत असून त्यामध्ये १,१२,२३२ निवासी व १,२६,३८१ अनिवासी असे एकूण २,३८,६१३ विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेतात. |

योजनेच्या अटी व शर्ती :

(१) लाभार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असला पाहिजे. (२) विजाभज संवर्गातील असला पाहिजे.

लाभाचे स्वरूप :

मान्यताप्राप्त संस्था खालील अनुदानास पात्र राहील.

(१) मान्य कर्मचाऱ्यांवरील १००% वेतन अनुदान. (२) शा. नि. दि. ३/३/२०१९ अन्वये दिनांक १/२/२०१९ पासून मान्य विद्यार्थी संख्येवर दरडोई दरमहा रुपये १,५०० प्रमाणे प्राथमिक निवासी शाळेसाठी ११ महिन्यांकरिता तर माध्यमिक निवासी शाळेसाठी १० महिन्यांकरिता परिरक्षण अनुदान देय राहील. (३) प्राथमिक शाळेच्या शाळा व वसतिगृह विभागासाठी आकस्मिक खर्चाकरिता मान्य निवासी विद्यार्थ्यांवरील मान्य कर्मचाऱ्यांच्या ६ व्या वेतनाचा ८% तर माध्यमिक शाळेसाठी मान्य कर्मचाऱ्यांच्या वार्षिक वेतनाच्या १२% किंवा प्रत्यक्ष झालेला खर्च यांपैकी कमी असेल तेवढे अनुदान दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अनुज्ञेय होते. (४) अनुदान उपलब्ध असल्यास प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेच्या इमारत बांधकामासाठी अनुक्रमे रुपये ३·०० लाख व रुपये ५·०० लाख याप्रमाणे अनुदान देय राहील. (५) शाळा व वसतिगृहाच्या इमारतीच्या भाडे मूल्यांकनाच्या ७५% इमारतभाडे अनुज्ञेय आहे. (६) कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या भोजन अनुदानाव्यतिरिक्त इतर अनुदान पहिले तीन वर्षे अनुज्ञेय नाही.

या योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना भोजन, शैक्षणिक साहित्य, गणवेश, प्रथमोपचार, अंथरुण पांघरूण इत्यादी सर्व सोयीसुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येतात.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी स्वयंसेवी संस्थांना सहाय्य अनुदाने. (वेतन व वेतनेतर) (२२२५-२५२२)<br><br>नवीन लेखाशीर्ष (२२२५-एफ-०४९) | २०१८–२०१९ | ५,००,०० | ३,५३,३१ | ४ शाळा | शासन निर्णय क्रमांक ऊसतोड–१०९५-प्र. क्र. १७७/मावक-६, दिनांक ७-३-१९९६ अन्वये शासनाने निवासी शाळांना मंजुरी दिलेली आहे. |
| | | २०१९–२०२० | ४,३०,४३ | ४,३०,३८ | ४ शाळा | योजनेचे उद्दिष्ट व स्वरूप : राज्यातील ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये व ते शिक्षणापासून वंचित राहू नये व त्यांना शिक्षण, भोजन, निवास एकाच छत्राखाली देणे या अंतर्गत बीड जिल्ह्यात २ ठिकाणी परळी वैजनाथ व केज येथे ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी प्राथमिक व माध्यमिक शाळांना मंजुरी दिलेली आहे. (प्राथमिक २ शाळा व माध्यमिक २ शाळा) |
| | | २०२०–२०२१ | ५,४६,०० | ५,०२,११ | ४ शाळा | योजनेच्या अटी व शर्ती : (१) विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. (२) लाभार्थी हा ऊसतोड कामगाराचा मुलगा/मुलगी असावी. |
| | | २०२१–२०२२ | ७,०२,७३ | ७,०२,७३ | ४ शाळा | लाभाचे स्वरूप : (१) या योजनेंतर्गत ऊसतोड कामगारांच्या निवासी विद्यार्थ्यास मोफत निवास, भोजन व शिक्षण देण्यात येते. त्याचप्रमाणे विछाना साहित्य, क्रमिक पुस्तके, वह्या, शालेय साहित्य व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. (२) शा. नि. दि. ३/३/२०१९ अन्वये दिनांक १/२/२०१९ पासून मान्य विद्यार्थी संख्येवर दरडोई दरमहा रुपये १५०० प्रमाणे प्राथमिक निवासी शाळेसाठी ११ महिन्यांकरिता तर माध्यमिक निवासी शाळेसाठी १० महिन्यांकरिता परिरक्षण अनुदान देय राहील. (३) प्राथमिक शाळेच्या शाळा व वसतिगृह विभागासाठी आकस्मिक खर्चाकरिता मान्य निवासी विद्यार्थ्यांवरील मान्य कर्मचाऱ्यांच्या ६ व्या वेतनाचा ८% तर माध्यमिक शाळेसाठी मान्य |
| | | २०२२–२०२३ | ८,०८,६५ | ८०,१८,६२ | ४ शाळा | |
| | | २०२३–२०२४ | ८,२७,०० | ७,५६,६४ | | |

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | कर्मचाऱ्यांच्या वार्षिक वेतनाच्या १२% किंवा प्रत्यक्ष झालेला खर्च यांपैकी कमी असेल तेवढे अनुदान दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अनुज्ञेय होते. (४) सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित केलेल्या भाड्याच्या ७५% इमारत भाडे अनुदान म्हणून देण्यात येते. (५) ऊसतोड कामगारांच्या निवासी शाळेत ४८० निवासी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. तसेच अनिवासी विद्यार्थ्यांना सुद्धा प्रवेश देण्यात येतो. |
| ११ | विद्यानिकेतन शाळा चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदाने. (२२२५-२६०२) नवीन लेखाशीर्ष (२२२५-एफ०३१) | २०१८—२०१९ | ४,०९,६३ | ४,०१,३० | १ शाळा | योजनेचे उद्दिष्ट व स्वरूप : महाराष्ट्रातील विजाभज विद्यार्थ्यांना निवासी शिक्षणाचा फायदा मिळावा आणि त्याची शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नती व्हावी या उद्देशाने शासनाने स्वयंसेवी संस्थांद्वारे सन १९५३ पासून आश्रमशाळा योजना अंमलात आणली तथापि विजाभज जमातीतील होतकरू व हुशार गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विद्यानिकेतन असावे अशी मागणी शासनाकडे होऊ लागल्याने शासन निर्णय, क्रमांक व्हीएएस/१०९०/प्र. क्र. १३५/मावक-६, दिनांक ६-११-१९९५ अन्वये स्वयंसेवी संस्थामार्फत विद्यानिकेतन सुरू करण्यास मंजुरी दिली व शासन निर्णय, दिनांक ३१-७-१९९६ अन्वये विमुक्त जाती सेवा समिती वसंतनगर, कोटग्याळ, ता. मुखेड, जि. नांदेड या स्वयंसेवी संस्थेस विद्यानिकेतन सन १९९६-९७ पासून सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली. त्यानुसार नांदेड येथे सन १९९६-९७ पासून एक विद्यानिकेतन कार्यरत आहे. सदरच्या विद्यानिकेतनात इ. ६ वी ते इ. १२ वी पर्यंतचे वर्ग क्रमाक्रमाने सुरू करण्यात येतील तसेच प्रत्येकी त्याच्या २ तुकड्या असून, २ तुकड्यांत मिळून ८० निवासी विद्यार्थी असतील.<br>योजनेच्या अटी व शर्ती : (१) लाभार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा. (२) लाभार्थी विजाभज असावा. (३) पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २४,००० पेक्षा जास्त नसावे. (४) सदर विद्यार्थ्यांना स्पर्धापरीक्षा देऊन प्रवेश घ्यावा लागेल. (५) विजाभज विद्यानिकेतनामध्ये फक्त विजाभज संचालनालयामार्फत अनुदानित प्राथमिक आश्रमशाळा इयत्ता ४ थी मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इयत्ता ५ वी मध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो.<br>लाभाचे स्वरूप : (१) प्रवेश घेतलेल्या लाभार्थ्यास निवास, भोजन, अंथरूण पांघरूण (कोटसह), क्रमिक पुस्तके, गणवेष, शालेय साहित्य, ग्रंथालय व लॅबोरेटरी इत्यादी सोयी मोफत पुरविण्यात येतात. (२) शासन निर्णय दिनांक ३-०३-२०१९ विद्यानिकेतन मधील लाभार्थ्यांच्या परिपोषणासाठी दरडोई दरमहा रुपये १,५०० विद्यार्थ्यांना पुस्तके, स्टेशनरी इत्यादींसाठी दरडोई दरमहा रुपये १,४५० तसेच विद्यार्थ्यांना अंथरूण पांघरूण, कोट इत्यादींकरिता दरडोई दरमहा रुपये १,००० असे अनुदान देण्यात येते. (३) विद्यानिकेतनवर होणारा संपूर्ण खर्च हा १०% संस्था व ९०% शासनामार्फत केला जातो. (४) शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर १००% खर्च शासनामार्फत केला जातो. (५) शा. नि. दि. ८-३-२०१९ अन्वये कर्मचाऱ्यांच्या वेतनावर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून शाळा विभागासाठी १२%, वसतिगृह विभागासाठी ८% खर्च वेतनेत्तर अनुदान देण्यात येते. (६) विद्यानिकेतन शाळेमध्ये ५६० निवासी विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात येतो. |
| | | २०१९—२०२० | ५,६५,२० | ५,९९,८२ | १ शाळा | |
| | | २०२०—२०२१ | ५,६५,२० | ४,०७,२४ | १ शाळा | |
| | | २०२१—२०२२ | ८,०७,६६ | ८,०७,६६ | १ शाळा | |
| | | २०२२—२०२३ | ७,९१,०० | ७,९०,८१ | | |
| | | २०२३—२०२४ | ८,४४,०० | ७,७७,०३ | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | इयत्ता ८ वी १० वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज व विमाप्र वर्गाच्या मुलींकरिता सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना. (२२२५-३१८२) नवीन लेखाशीर्ष (२२२५-ई-९८२) ( महिलाविषयक योजना ) | २०१८–२०१९<br>२०१९–२०२०<br>२०२०–२०२१<br>२०२१–२०२२<br>२०२२–२०२३<br>२०२३–२०२४ | १५,००,००<br>१५,००,००<br>१४,००,००<br>११,११,१८<br>३०,००,००<br>१६,००,०० | १४,८२,१६<br>८,९३,४३<br>...<br>११,११,१८<br>१,८३,७७<br>१५,९६,०१ | १४,८२,१६<br>८,९३,४३<br>...<br>११,११,१८<br>१,८३,७७ | **योजनेचे उद्दिष्ट व स्वरूप :** शासन निर्णय, क्रमांक इमाव–२००३/प्र. क्र. २०१/मावक-३, दिनांक २३–५–२००३ अन्वये विजाभज व विमाप्र वर्गातील मुलींचे शिक्षणाचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे. मुलींना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी व प्रोत्साहन मिळावे, याकरिता सदर योजना राबविली जाते.<br>**योजनेच्या अटी व शर्ती :** (१) विद्यार्थिनी ही विजाभज व विमाप्र या प्रवर्गातील असावी. (२) तिने शासन मान्य शाळेत प्रवेश घेतलेला असावा व ती इयत्ता ८ वी ते १० वी नियमित वर्गात शिकत असावी.<br>**लाभाचे स्वरूप :** इयत्ता ८ वी ते १० वी मधील प्रत्येक विद्यार्थिनीस दरमहा रुपये १०० प्रमाणे दहा महिन्यांसाठी रुपये १,००० संबंधित शिक्षण संस्थेमार्फत अदा करण्यात येते.<br>शासन निर्णय दि. २४ मार्च २०२३ अन्वये ८ वी ते १० वी पर्यंत रु. ३०० प्रमाणे दर दहा महिन्यासाठी ३००० प्रमाणे. |
| १३ | इयत्ता १० वीच्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या तसेच १२ वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज व विमाप्र वर्गाच्या मुला-मुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदाने. (२२२५-३१११) नवीन लेखाशीर्ष (२२२५-ई ९५५) | २०१८–२०१९<br>२०१९–२०२०<br>२०२०–२०२१<br>२०२१–२०२२<br>२०२२–२०२३<br>२०२३–२०२४ | ६,९१,६२<br>७,००,००<br>५,००,००<br>९,१३,४६<br>...<br>६,४०,०० | ६,९१,४४<br>६,५३,३३<br>५०,००<br>९,१३,४६<br>...<br>६,३९,९९ | २,३०,४८<br>३,२०,७४<br>१,६९,७६<br>१५,४३<br>...<br>... | (अ) राज्यातील विजाभज/विमाप्र मुला-मुलींचा शैक्षणिक दर्जा सुधारावा व त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ व्हावी व तसेच सर्वसाधारण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्पर्धेत ते टिकून रहावेत म्हणून शासनाने इ. १० वी चे परीक्षेत ७५% पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या व ११ वी मध्ये प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांना सन २००३-२००४ पासून सदरची योजना शासन निर्णय, क्रमांक इमाव-२००३/ प्र. क्र. २०४/मावक-३, दिनांक २५-७-२००३ अन्वये लागू केलेली आहे.<br>**(ब) योजनेच्या अटी व शर्ती :** (१) ही योजना इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयातील विजाभज/विमाप्र विद्यार्थ्यांना लागू राहील. (२) ही योजना भारत सरकार शिष्यवृत्ती व इतर गुणवत्ता शिष्यवृत्ती व्यतिरिक्त असेल. (३) शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची अट नाही. (४) इयत्ता १० वी मध्ये ७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण असणे आवश्यक आहे. (५) शिष्यवृत्ती १० महिन्यांसाठी लागू राहील.<br>**(क) योजनेचा लाभ :** (१) विजाभज/विमाप्र विद्यार्थ्यांना इ. ११ वी व १२ वी साठी प्रतिमाह रु. ३०० प्रमाणे १० महिन्यांसाठी रु. ३,००० इतका लाभ देण्यात येतो. |

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १४ विजाभज व इमाव उमेदवारांना संगणक, मोटार वाहन चालविणे, मिलीटरी पूर्व व पोलीस भरती आणि राज्य–केंद्र सरकारच्या स्पर्धात्मक परिक्षेचे प्रशिक्षण. | | | | | | |
| | वाहन चालक / वाहक प्रशिक्षण | २०१८–२०१९ | १६,००,०० | १६,००,०० | ... | शासन निर्णय, क्रमांक विजाभज-२००८/प्र. क्र . २१३/मावक-३, दिनांक २३ जुलै २००९ नुसार सरकारमान्य प्रशिक्षण संस्थेकडे विमुक्त जाती व भटक्या जमाती/इतर मागास वर्ग/विशेष मागास प्रवर्ग युवक/युवतींना मोटार वाहन चालक/वाहक प्रशिक्षण योजना सन २००९–१० पासून सुरू करण्यात आलेली आहे. |
| | २२२५ सी ९११ | २०१९–२०२० | ७,००,०० | ३,४८,०३ | ... | |
| | (सुधारित योजना) | २०२०–२०२१ | १ | ... | ... | |
| | सन २००९-१० पासून सुरू. | २०२१–२०२२ | १ | ... | ... | |
| | नवीन लेखाशीर्ष | २०२२–२०२३ | १ | ... | | |
| | (२२२५-ई-८०१) | २०२३–२०२४ | १ | | | |

शासन निर्णय क्र. इबीसी २०१२/प्र. क्र. ३५/शिक्षण-१/ दि. २७ फेब्रुवारी २०१३ नुसार सदर योजने अंतर्गत खालीलप्रमाणे सर्व खर्चासह दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

| अ. क्र. | प्रशिक्षणाचा प्रकार | प्रशिक्षण कालावधी | मंजूर दर |
|---|---|---|---|
| १. | हलके मोटार वाहन चालक प्रशिक्षण | ४० दिवस | रु. ४,२६४.०० |
| २. | अवजड मोटार वाहन चालक प्रशिक्षण | ४० दिवस | रु. ४,९६०.०० |
| ३. | वाहक कंडक्टर | ८ दिवस | रु. १,७२८.०० |

सदर योजने अंतर्गत राज्यातील २०० ठिकाणी तालुका व जिल्हा स्तरावरून प्रशिक्षण देणेसाठी मे. रमेश मोटार ड्रायव्हींग स्कूल, जळगाव या संस्थेस मान्यता देण्यात आली आहे. उमेदवारांच्या प्रशिक्षण फी मध्ये उमेदवारांचे प्रशिक्षण, प्रशिक्षण कालावधीमध्ये जिल्हा कार्यालय ते प्रशिक्षण केंद्रापर्यंत येण्याजाण्याचे प्रत्यक्ष भाडे आरोग्य तपासणी छायाचित्र, कच्च्या पावत्या व पक्का परवाना, वाहन परवाना, बिल्ला राहण्याची व जेवणाची व्यवस्था इत्यादी सेवा प्रशिक्षण संस्थेमार्फत पुरविण्या-बाबतचा समावेश आहे. तसेच प्रशिक्षण केंद्राच्या मुख्यालयाच्या ठिकाणी राहणारे, स्थानिक प्रशिक्षण केंद्राच्या मुख्यालयाच्या ठिकाणी राहणारे स्थानिक प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण संस्थेच्या वसतिगृहात राहात नसल्यास मोटार वाहन चालक प्रशिक्षणार्थी रुपये ३०० वाहक प्रशिक्षणार्थीस रु. १५० प्रशिक्षण काळात विद्यावेतन देणे प्रशिक्षण संस्थेवर बंधनकारक आहे. जिल्हा कार्यालय प्रशिक्षण प्रकार निहाय शुल्क किमान ३०० विद्यार्थ्यांचे उद्दिष्ट बंधनकारक राहील.

संगणक, मिलीटरी पूर्व व पोलीस भरती आणि राज्य-केंद्र सरकारच्या स्पर्धात्मक परिक्षेचे प्रशिक्षण या योजनेचा शासन निर्णय अद्याप प्रलंबित आहे.

सद्यःस्थितीमध्ये शासन निर्णय क्र. मो वाप्र-२०१८/प्र. क्र. ९३/ विजाभज-१/दि. ११-१०-२०१८ अन्वये विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या युवक व युवतींकरीता मोटार वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजना राबविण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १५ | माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या मा गा स व र्गी य विद्यार्थ्यांना शिष्य-वृत्या विजाभज/विमाप्र (फक्त मुंबईकरिता) (२२०५-०७८२) नवीन लेखाशीर्ष (२२२५-ई-८९३) | २०१८–२०१९<br>२०१९–२०२०<br>२०२०–२०२१<br>२०२१–२०२२<br>२०२२–२०२३<br>२०२३–२०२४ | २,४०<br>१,००<br>१,००<br>७,१२<br>१,४३<br>१,५० | २,४०<br>६०<br>...<br>७,१२<br>१,०७<br>६२ | ८,००<br>२,००<br>...<br>२३,७९ | शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्र. इबीसी-प्र. क्र. ९७/शिक्षण, दिनांक ३०-१२-२०११ अन्वये सुरू करण्यात आलेली असून शासन निर्णय, दिनांक १०-०९-२०१५ अन्वये विमाप्र विद्यार्थ्यांसाठी लागू करण्यात आलेला आहे.<br>**योजनेची उद्दिष्टे व स्वरूप :** (१) माध्यमिक शाळेतील हुशार व गुणवान विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे. (२) या योजने अंतर्गत प्रत्येक शाळेतील इयत्ता ५ वी ते १० वीच्या वर्गामध्ये गतवर्षाच्या वार्षिक परीक्षेत ५०% पेक्षा जास्त गुण घेऊन प्रथम व द्वितीय क्रमांकाने पास होणारा विद्यार्थी या योजनेस पात्र आहे.<br>**योजनेच्या अटी व शर्ती :** विद्यार्थी मान्यताप्राप्त शाळेत शिकत असलेला असावा. त्याने गतवर्षाच्या इयत्ता ५ वी ते १० वीपर्यंतच्या वार्षिक परीक्षेत ५०% पेक्षा जास्त गुण घेऊन तो वर्गामध्ये प्रथम किंवा द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेला असावा. तो विजाभज व विमाप्र या प्रवर्गातील नमूद जातींपैकी असावा.<br>**लाभाचे स्वरूप :** (१) इयत्ता ५ वी ते ७ वी दरमहा २० रुपयाप्रमाणे १० महिन्यांसाठी २०० रुपये. (२) इयत्ता ८ वी ते १० वी दरमहा ४० रुपये प्रमाणे १० महिन्यांसाठी ४०० रुपये प्रतिविद्यार्थी. |
| १६ | मा गा स व र्गी य विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देणे. विजाभज व विमाप्र (जिल्हा परिषद) (२२२५-०८८९) नवीन लेखाशीर्ष (२२२५-एफ-०११) | २०१८–२०१९<br>२०१९–२०२०<br>२०२०–२०२१<br>२०२१–२०२२<br>२०२२–२०२३<br>२०२३–२०२४ | २,२४,५९<br>१<br>१<br>१<br>८,९१,६८ | २,२१,६९<br>०<br>...<br>... | ७,३८,९६<br>०<br>...<br>... | विजाभज, विमाप्र प्रवर्गासाठी शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक ईबीसी–१०९४/५११०९/मावळ-२/दि. १७-८-१९९५.<br>**योजनेचे उद्दिष्ट व स्वरूप :**<br>(१) माध्यमिक शाळेतील हुशार व गुणवत्ता विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे.<br>(२) या योजने अंतर्गत प्रत्येक शाळेतील इयत्ता पाचवी ते दहावीच्या वर्गामध्ये गतवर्षाच्या वार्षिक परीक्षेत ५० टक्क्यांपेक्षा जास्त गुण घेऊन वर्गामध्ये प्रथम व द्वितीय क्रमांकाने पास होणारा विद्यार्थी या योजनेस पात्र आहे.<br>**योजनेच्या अटी व शर्ती :**<br>(१) विद्यार्थी मान्यताप्राप्त शाळेत शिकत असलेला असावा. (२) त्याने गतवर्षाच्या इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतच्या वार्षिक परीक्षेत ५० टक्क्यांपेक्षा जास्त गुण घेऊन तो वर्गामध्ये प्रथम किंवा द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेला असावा. (३) तो विजाभज व विमाप्र या प्रवर्गातील नमूद जातींपैकी असावा.<br>**लाभाचे स्वरूप :** (अ) इयत्ता पाचवी ते सातवीसाठी दरमहा रुपये २० प्रमाणे दहा महिन्यांसाठी रुपये २०० प्रतिविद्यार्थी. (ब) इयत्ता आठवी ते दहावीसाठी दरमहा रुपये ४० प्रमाणे दहा महिन्यांसाठी रुपये ४०० प्रतिविद्यार्थी. |

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १७ | माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण फी, परीक्षा फी (मॅट्रिकपूर्व) प्रदान करणे विजाभज व विमाप्र (जिल्हा परिषद). (२२५०-०८८९) नवीन लेखाशिर्ष (२२२५-एफ०११) | २०१८–२०१९ | १,५२,०५ | १,४४,६९ | ३,८५,८४ | (अ) शासन निर्णय, क्रीडा व समाजकल्याण विभाग क्रमांक ईबीसी–११६८/८३५६७-ए, दि. २४–१२–१९७० अन्वये ही योजना लागू करण्यात आलेली असून शासन निर्णय, दिनांक २९–१०–१९९६ अन्वये विमाप्र विद्यार्थ्यांना लागू करण्यात आलेला आहे.<br>(ब) योजनेचे उद्दिष्ट व स्वरूप :<br>मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता सर्व स्तरांवरील मान्यताप्राप्त अभ्यासक्रमासाठी शिक्षणशुल्क व परीक्षा शुल्क अदा केले जाते. यामध्ये प्रवेश सत्र, वाचनालय, प्रयोगशाळा, क्रीडा इत्यादी शुल्कांचा समावेश आहे.<br>(क) योजनेच्या अटी व शर्ती :<br>(१) संबंधित विद्यार्थी हा मान्यताप्राप्त शाळेत शिक्षण घेत असलेला असावा. (२) तो विजाभज, विमाप्र या प्रवर्गातील नमूद केलेल्या जातीचा असावा. (३) विद्यार्थ्यांचे वय, उत्पन्न विचारात न घेता या योजनांतर्गत सर्व स्तरांवरील मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांसाठी अशा शुल्क माफी देय आहेत.<br>(ड) लाभाचे स्वरूप : या योजने अंतर्गत संबंधित शाळांना जी फी अनुज्ञेय आहे, ती म्हणजेच प्रवेश शुल्क, वाचनालय, क्रीडा, प्रयोगशाळा अशा स्वरूपाच्या फी संबंधित शाळांना परस्पर अदा केली जाते. तसेच एक वेळ नापास झालेल्या विद्यार्थ्यांना देखील या शुल्काची प्रतिपूर्ती केली जाते. |
| | | २०१९–२०२० | ० | ० | ० | |
| | | २०२०–२०२१ | ... | ... | ... | |
| | | २०२१–२०२२ | १ | ... | ... | |
| | | २०२२–२०२३ | ८,९१,६८ | ८,४६,१८ | | |
| | | २०२३–२०२४ | १३,१४,०० | १३,१४,०० | | |
| १८ | इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती. (विजाभज, विमाप्र) (जिल्हा परिषद) (२२२५-०८८९) (महिलाविषयक योजना). नवीन लेखाशिर्ष (२२२५-एफ०११) | २०१८–२०१९ | ५,१३,३६ | ५,१३,३६ | ८,५५,६० | १००% महिलांची योजना<br>शासन निर्णय, क्रमांक ईबीसी–१०९४/३२०३८/प्र. क्र.९०/मावक-२, दि. १२–१–१९९६ अन्वये विजाभज विद्यार्थीनींकरिता तर २९ ऑक्टोबर ९६ पासून विमाप्र विद्यार्थीनींना लागू करण्यात आलेली आहे.<br>योजनेचे उद्दिष्ट व स्वरूप : मागासवर्गीय मुलींचे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रोत्साहनपर अनुदान म्हणून शिष्यवृत्ती दिली जाते. या योजने अंतर्गत इयत्ता ५ वी ते ७ वी मधील विजाभज, विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती दिली जाते. |
| | | २०१९–२०२० | ० | ० | ० | |
| | | २०२०–२०२१ | ... | ... | ... | |
| | | २०२१–२०२२ | १ | ... | ... | |
| | | २०२२–२०२३ | ८,९१,६८ | | | |

**योजनेच्या अटी व शर्ती :** (१) विद्यार्थीनी ही विजाभज, विमाप्र प्रवर्गातील असावी. (२) शासनमान्य शाळेत इयत्ता ५ वी ते ७ वीच्या वर्गात प्रवेश घेतलेला असावा. (३) उत्पन्नाची व गुणाची अट राहणार नाही.

**लाभाचे स्वरूप :** इयत्ता ५ वी ते ७ वी मधील विद्यार्थीनीस दरमहा ६० रुपये प्रमाणे १० महिन्यांसाठी रुपये ६०० शिष्यवृत्तीची रक्कम संबंधित शाळांमार्फत अदा केली जाते.

---

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९ | वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना. (२२२५-३३२२) नवीन लेखाशीर्ष (२२२५-एफ०५८) | २०१८–२०१९ | ४८,००,०० | ४७,९९,२७ | ... |
| | | २०१९–२०२० | ८०,००,०० | ३३,३५,३५ | ... |
| | | २०२०–२०२१ | १,००,००,०० | ... | ... |
| | | २०२१–२०२२ | १,००,००,०० | ५९,९९,९७ | ... |
| | | २०२२–२०२३ | १,००,००,०० | ... | ... |
| | | २०२३–२०२४ | ३,८०,००,०० | ० | ... |

राज्यातील लमाण, बंजारा, धनगर, पारधी अशा अनेक समुहांचे तांडे/वस्त्या असून अशा तांड्यामध्ये या जमाती वसाहतीने रहात आहेत. असे तांडे किंवा वस्त्यांमध्ये कोणत्याही नागरी सुविधा उपलब्ध होत नाहीत. बहुसंख्य समाज गरीबीचे जीवन जगत असून त्या समाजातील तांडे व वस्त्यांमधील लोकांना स्थिर जीवन जगता यावे याकरीता शासनाने "दलित वस्ती" सुधार योजनेच्या धर्तीवर शासन निर्णय क्रमांक इमाव-२००३/प्र.क्र.२०५/मावक-३, दिनांक-७/६/२००३ अन्वये तांडा/वस्ती सुधार योजना सुरू केलेली आहे.

वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करिता शासन निर्णय क्र.तांसुयो २०१७/प्र.क्र.८४/विजाभज-१, दि. ३० जानेवारी २०१८ व शासन शुध्दीपत्रक क्र. तांसुयो-२०१७/ प्र.क्र.८४/विजाभज-१, दि. १९/१/२०१९ निर्गमित करण्यात आलेले आहे.

**योजनेचे उद्दिष्टे व स्वरूप :**

तांडा वस्ती मध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे व तेथील नागरिकांच्या जीवनाचा दर्जा सुधारणे.

**योजनेच्या अटी व शर्ती :**

(१) तांडा वस्तीची किमान ५० लोकसंख्या असणे आवश्यक आहे.

(२) सदर योजने अंतर्गत ग्रामीण भागात १. विद्युतीकरण (हायमॅक्स/पथदिवे/एलईडी) २. पिण्याचे पाणी ३. अंतर्गत गटारे ४. गटारे ५. शौचालय तसेच समाज मंदिर/वाचनालय व शक्य असेल तेथे मुख्य रस्त्याला जोडणाऱ्या रस्त्याची कामे व पायाभूत सुविधा दर्शविलेल्या क्रमाने देण्यात येतात.

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | लाभाचे स्वरूप : सदर योजनेअंतर्गत तांडे/वस्त्यांमध्ये पायाभुत सुविधा निर्माण करण्यासाठी त्या प्रवर्गातील लोकसंख्येच्या निकषावर संबंधित ग्रामपंचायर्तीना अनुदान उपलब्ध करून दिले जाते. |
| २० | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना. (२२२५-डी २४२) | २०१८–२०१९ | ८,२२,१० | ८,२२,१० | ... | (अ) शासन निर्णय, क्र. गृनियो-२०१७/प्र.क्र.६०/विजाभज-१ दि. २४-१-२०१८ शासन शुध्दीपत्रक गृनियो-२०१७/प्र.क्र.६० विजाभज-१ दि. ८/३/२०१९ व शासन शुध्दीपत्रक गृनियो-२०१७/प्र.क्र.६० विजाभज-१, दि ११/९/२०१९ अन्वये विमुक्त जाती भटक्या जमाती या घटकासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. |
| | | २०१९–२०२० | १०,००,०० | ८८,२२ | ... | |
| | | २०२०–२०२१ | २०,००,०० | ... | ... | |
| | | २०२१–२०२२ | ५०,००,०० | २९,९९,९० | ... | |
| | नवीन लेखाशीर्ष (२२२५-ई-८२१) | २०२२–२०२३ | ५५,००,०० | | ... | |
| | | २०२३–२०२४ | १,८०,००,०० | ० | ... | (ब) योजनेचे उद्दिष्ट व स्वरूप : |

| अ.क्र. | लोकसंख्या | अनुदान रक्कम (रु. लाखांत) |
|---|---|---|
| १ | ५० ते १०० पर्यंत | ४·०० |
| २ | १०१ ते १५० | ६·०० |
| ३ | १५१ ते पुढे | १०·०० |

लाभार्थी कुटुंब हे विजाभजच्या मुळ प्रवर्गातील, गावोगावी भटकंती करून उपजीविका करणारे असावे, त्यांचे वार्षिक उत्पन्न रु. १ लक्ष पेक्षा कमी असावे, वसाहतीकरीता लाभार्थ्यांचे स्वतःच्या मालकीचे घर नसावे, झोपडी, कच्चे घर, पालामध्ये राहणारे असावे. वैयक्तीक लाभार्थ्यांकडे स्वतःची जागा असावी आणि आजपर्यंत त्याने केंद्र व राज्य शासनाच्या कोणत्याही आवास योजनेचा लाभ घेतला नसला पाहिजे. कुटूंबातील एकच व्यक्ती यास पात्र राहील.

(क) लाभाचे स्वरूप :

सुधारीत शासन निर्णयात नमुद तरतूदी प्रमाणे योजनेचा लाभ देण्यात येतो.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २१ | महात्मा बसवेश्वर | २०१९–२०२० | १ | ० | ... |
| | सामाजिक समता-शिवा | २०२०–२०२१ | ६,४० | ... | ... |
| | पुरस्कार | २०२१–२०२२ | ६,४० | ... | ... |
| | | २०२२–२०२३ | ७,०५ | ... | |
| | नवीन लेखाशीर्ष | २०२३–२०२४ | ३२,४० | ० | |
| | (२२२५-एफ-२९२) | | | | |

शासन निर्णय क्रमांक-२०१६/प्र.क्र. ४६७/महामंडळे, दि. ८/६/२०१६ अन्वये वीरशैव-लिंगायत समाजाचा सामाजिक, शैक्षणिक, समाज कल्याण संघटनात्मक, अध्यात्मिक व आर्थिकदृष्ट्या विकास होण्यासाठी सामाजिक, कलात्मक, समाज संघटनात्मक, अध्यात्मिक प्रवोधन व साहित्यिक, क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कलावंत, साहित्यिक, समाज संघटनात्मक कार्यकर्ते, अध्यात्मिक प्रवोधनकार व समाज सेवकांना/संस्थांना "महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिवा पुरस्कार" हा पुरस्कार राज्यातील एक व्यक्ती व एका संस्थेची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करुन प्रतिवर्षी महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमीत्त प्रतिवर्षी वैशाख शुध्द (अक्षय तृतीया) हा पुरस्कार देवून सन्मानित करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित झालेला आहे.

शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. २८/विजाभज, इमाव व विमाप्र-१, दि. ८/३/२०१९ अन्वये सदर योजनेसाठी पुरस्काराची निवड, निकष, पात्रता, इत्यादीबाबत स्वतंत्र नियमावली देण्यात आलेली आहे. त्यामधील नियमावली क्र. ८ मध्ये जिल्हा दक्षता समितीने व विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी केलेल्या शिफारशीनुसार आलेल्या सर्व अर्जाची छाननी करून संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र संचालनालय पुणे हे अर्ज/प्रस्ताव, शिफारस पुस्तिकेच्या रुपात एकत्र करून शासनाकडे विचारासाठी पाठवतील असे नमुद आहे.

समाजसेवक, कलावंत, समाज कल्याण संघटनात्मक कार्यकर्ते, आध्यात्मिक प्रबोधनकार व साहित्यिकांसाठी पात्रता-

(१) या योजनेनुसार वीरशैव-लिंगायत समाजाकरिता समाजकल्याण, संघटनात्मक, कलात्मक, आध्यात्मिक प्रबोधन आणि साहित्यिक क्षेत्रात कार्य करणारे तथा कल्याणासाठी झटणाऱ्या नामवंत, समाजसेवक, कलावंत, समाज कल्याण संघटनात्मक कार्यकर्ते, आध्यात्मिक प्रबोधन व साहित्यिक असावेत.

(२) वीरशैव-लिंगायत समाजासाठी कार्य करणारे समाज कल्याण, कलावंत, समाज संघटनात्मक कार्यकर्ते व साहित्यिक क्षेत्रात कमीत कमी दहा वर्षे कार्य केलेले असावे.

सामाजिक संस्थांसाठी पात्रता-

(१) समाजकल्याण क्षेत्रात वीरशैव-लिंगायत समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण, आरोग्य, अध्यात्मिक विकास करणे, अन्याय निर्मूलन करणे, अंधश्रध्दा रुढी निमूर्लन करणे, सामाजिक न्याय मिळवून देणे. सामामजिक व संघटनात्मक जनजागरण करणे इ. क्षेत्रात कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांना हा पुरस्कार दिला जाईल.

(२) स्वयंसेवी संस्था राजकारणापासून अलिप्त असावी. तसेच जिचे कार्य व सेवाही पक्षातील व राजकारणापासून स्वतंत्र व अलिप्त असावी.

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २२ | मागासवर्गीय व सहकारी गृहनिर्माण योजना. (२२१६-२५२१) | २०१८—२०१९ | १ | ० | ... | मागासवर्गीय समाजाच्या लोकांना व विशेष मागासप्रवर्गातील लोकांना सहकारी माध्यमातून निवारा उपलब्ध करून देणे. कमीत कमी ११ मागासवर्गीय सभासद एकत्रित येऊन संस्था सहकार विभागाकडे पंजीबद्ध केली असली पाहिजे. वार्षिक रु. ५०,००० पेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या सभासदांनी खर्चाच्या मर्यादेच्या २०% वैयक्तिक वर्गणी भरल्यानंतर विभागीय समाजकल्याण अधिकारी यांचेमार्फत बांधकाम अनुदान दिले जाते.<br><br>**योजनेच्या अटी व शर्ती :**<br><br>(१) मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था ही नोंदणीकृत असावी. (२) योजनेचा लाभ देण्यासाठी शासनाने राज्याच्या क्षेत्राची दोन गटांत विभागणी केलेली आहे ती खालीलप्रमाणे : (अ) महानगरपालिका क्षेत्र आणि अ व ब वर्ग नगरपालिकेचे क्षेत्र, (ब) क वर्ग नगरपालिकेचे क्षेत्र व ग्रामीण क्षेत्र. (३) ज्याचे वार्षिक उत्पन्न रु. ५०,००० पेक्षा कमी आहेत ते लाभार्थी जमीन बांधकाम अनुदान व इतर अन्य सवलतीसाठी पात्र ठरतात. (४) शासकीय जमीन उपलब्ध असल्यास ती विनामूल्य देण्यात येते. संस्थेने एखादी जमीन घेतली असेल तर जमीनीची किंमत नगर रचना विभाग ठरवेल यापैकी जी रक्कम कमी असेल ती संस्थेला जमीन अनुदान म्हणून देण्यात येईल. (५) क्षेत्र विभागानुसार विभागाने बांधकाम खर्चाची विभागणी निश्चित केली असून त्याच्या ३०% बांधकाम अनुदान म्हणून रक्कम देण्यात येईल. ती घेतलेल्या कर्जावर बांधकाम खर्चाच्या मर्यादेच्या अधीन राहून १०% व्याज अनुदान देय राहील. तसेच जमीन विकासासाठी बिनव्याजी कर्ज सभासदांना अनुज्ञेय राहील.<br><br>**लाभाचे स्वरूप :**<br><br>शासकीय जमीन उपलब्ध असल्यास ती विनामूल्य देण्यात येते. संस्थेने खाजगी जमीन घेतली असेल तर जमिनीची किंमत नगररचना विभाग ठरवेल यापैकी ती रक्कम कमी असेल ती रक्कम संस्थेला जमीन अनुदान म्हणून देण्यात येईल. क्षेत्र विभागानुसार बांधकाम खर्चाची मर्यादा निश्चित केलेली असून त्याच्या ३०% बांधकाम अनुदान म्हणून रक्कम देण्यात येईल. घेतलेल्या कर्जावर बांधकाम खर्चाच्या अधीन राहून १०% व्याज अनुदान अनुज्ञेय राहील. तसेच जमीन विकासासाठी बिनव्याजी कर्ज सभासदांना अनुज्ञेय राहील. |
| | | २०१९—२०२० | १ | ० | ... | |
| | | २०२०—२०२१ | १ | ... | ... | |
| | | २०२१—२०२२ | २०,२५,०० | २०,२५,०० | ... | |
| | | २०२२—२०२३ | १ | ० | | |
| | नवीन लेखाशीर्ष (२२१६-३१०५) | २०२३—२०२४ | १ | ० | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २३ | शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून विजाभज, विमाप्रच्या उमेदवारांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याच्या योजना, (मागेल त्याला प्रशिक्षण). (२२२५-३२०६) | २०१८—२०१९ | १ | ... | ... | राज्यातील विजाभज/विमाप्र जातीतील अल्पशिक्षित उमेदवारांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या प्रशिक्षण सुविधांची व साधन सामग्रीचा यथा योग्य वापर करून अल्प कालावधीचे प्रशिक्षण देवून या प्रशिक्षित उमेदवारांना स्वयंरोजगार मिळवून देण्यासाठी व सेवाविषयक कामे करण्याची संधी मिळावी या करिता विमाप्र/विजाभजच्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची योजना शासन निर्णय, क्र. इमाव-२००३/प्र. क्र.२०८/मावक-३, दिनांक २५ जुलै २००३ ०अन्वये शासनाने मंजुरी दिली आहे. सदरची योजना संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय मुंबई यांचेमार्फत राबविण्यात येते. |
| | | २०१९—२०२० | १ | ... | ... | |
| | | २०२०—२०२१ | १ | ... | ... | |
| | | २०२१—२०२२ | १ | ... | ... | |
| | | २०२२—२०२३ | १ | ... | ... | |
| | नवीन लेखाशीर्ष (२२२५-ई-९६४) | २०२३—२०२४ | १ | ० | | योजनेचे स्वरूप : (१) राज्यातील एकंदर ३४७ कार्यरत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून प्रशिक्षण देण्याची योजना राबविण्यात येईल. (२) सदरचे प्रशिक्षण संस्थेतील नियमित प्रशिक्षणाच्या वेळेनंतर दररोज ४ तास आयोजित केली जाईल. (३) स्थानिक गरजानुसार व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाईल. (क) या योजने अंतर्गत प्रत्येक लाभार्थीसाठी सरासरी रुपये २,५०० खर्च अपेक्षित असून त्यामध्ये प्रशिक्षकांचे मानधन, कच्च्यामालावरील खर्च, टुलकीट संच, विद्यावेतन इत्यादी खर्चाचा समावेश आहे. |
| २४ | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्तीय व वीज भांडवल योजना व विकास महामंडळ प्रधान लेखा शीर्ष. (२२२५+४२२५) | | | | | **८. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्यादित, मुंबई** महाराष्ट्रातील ओ.बी.सी. (इतर मागासवर्ग) प्रवर्गाच्या आर्थिक उन्नतीसाठी व त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने दिनांक २३-४-१९९९ रोजी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाची स्थापना केली असून या महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रुपये ५० कोटी इतके आहे. दरवर्षी रुपये ५ कोटी इतके भागभांडवल उपलब्ध करून देण्याचे ठरविण्यात आले आहे. सन २००७—२००८ साठी शासनाने या महामंडळासाठी रु. ७०० लक्ष एवढी भागभांडवल निधीची अर्थसंकल्पीय तरतूद केलेली आहे. शासनाने मार्च २००७ पर्यंत महामंडळास रुपये ३८८७·९५ लक्ष भागभांडवलापोटी उपलब्ध करून दिले आहेत. या महामंडळामार्फत खालील योजना राबविण्यात येत आहेत. |

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २४ | पुढे चालू | | | | | (१) बीज भांडवल कर्ज योजना :— ही योजना महामंडळ राबवित असून त्याची प्रकल्प मर्यादा ५.०० (पाच) लाखापर्यंत राहील. लाभार्थीने सादर केलेल्या एकूण प्रकल्प खर्चाच्या २० टक्के रक्कम महामंडळ बीज भांडवल कर्ज म्हणून देईल. त्या कर्जावर ६ टक्के व्याज आकारण्यात येईल. परतफेडीचा कालावधी पाच वर्षे आहे. लाभार्थ्यांचा सहभाग एकूण योजनेच्या ५ टक्के राहील. प्रकल्प खर्चाच्या ७५ टक्के इतके कर्ज बँकेमार्फत मंजूर करण्यात येईल. बँक कर्जाची परतफेड बँकेच्या अटी व शर्तीनुसार राहील.<br><br>(२) राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाच्या योजना :— राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्लीची 'वाहिनीकृत यंत्रणा', म्हणून महामंडळ कार्य करते. महामंडळास शासनाने दिलेल्या ठोक हमीच्या पोटी राष्ट्रीय महामंडळाकडून अल्प व्याज दराने कर्ज पुरवठा करण्यात येतो. महामंडळ सदर रकमेतून राष्ट्रीय महामंडळाच्या विविध योजनांतर्गत लाभार्थींना कर्ज वितरित करते. या महामंडळामार्फत राष्ट्रीय महामंडळाच्या खालील योजना राबविण्यात येतात. यामध्ये (अ) दीर्घ मुदती कर्ज योजना, (ब) मार्जिन मनीयोजना, (क) सूक्ष्म पत पुरवठा योजना, (ड) महिलांसाठी स्वर्णिमा योजना, (इ) व्यावसायिक व अभियांत्रिक शिक्षण कर्ज योजना, (ई) स्वयं-सक्षम कर्ज योजना व (फ) महिला समृद्धी योजना.<br><br>राष्ट्रीय महामंडळाच्या योजनांचे थोडक्यात स्वरूप पुढीलप्रमाणे<br><br>(अ) दीर्घ मुदती कर्ज योजना :— या योजनेंतर्गत प्रकल्प खर्च मर्यादा जास्तीत जास्त रुपये ३·०० (तीन) लाखापर्यंत असेल. प्रकल्प खर्चाच्या ८५ टक्के राष्ट्रीय महामंडळाचे कर्ज राहील. त्यावर ६ टक्के दराने व्याज आकारण्यात येईल. लाभार्थ्यांचा प्रकल्प खर्चाच्या ५ टक्के राहील. तर राज्य महामंडळ प्रकल्प खर्चाच्या १० टक्के इतके बीज भांडवल कर्ज देईल. त्यावर वार्षिक ६ टक्के दराने व्याज आकारण्यात येईल.<br>(ब) मार्जिन मनी योजना :— या योजनेंतर्गत प्रकल्प खर्चाच्या ४० टक्के रक्कम राष्ट्रीय महामंडळाचे कर्ज त्यावर ६ टक्के दराने व्याज. परंतु जास्तीत जास्त रुपये ५·०० (पाच) लाख इतके कर्ज राष्ट्रीय महामंडळ मंजूर करेल. एकूण रकमेच्या ५ टक्के इतका लाभार्थ्यांचा सहभाग राहील व एकूण प्रकल्प खर्चाच्या ५ टक्के इतकी रक्कम राज्य महामंडळ बीज भांडवल कर्ज म्हणून मंजूर करेल. त्यावर ६ टक्के दराने व्याज आकारण्यात येईल. प्रकल्प खर्चाच्या उर्वरित ५० टक्के सहभाग बँकेमार्फत बीज भांडवल कर्ज म्हणून करण्यात येईल. त्याची परतफेड बँकेच्या अटी व शर्तीनुसार लाभार्थ्याला करावी लागेल.<br>(क) सूक्ष्म पतपुरवठा योजना :— ही योजना या क्षेत्रामध्ये ३ वर्षे कार्यरत असलेल्या नोंदणीकृत अशासकीय स्वयंसेवी संस्थेमार्फत राबविण्यात येते. संस्थेला द्यावयाच्या कर्जाची मर्यादा रुपये ५,००,००० पर्यंत, वैयक्तिक लाभार्थी कर्ज मर्यादा रुपये २०,००० या रकमेपैकी ९५ टक्के राष्ट्रीय मंडळाचे व ५ टक्के हिस्सा लाभार्थींचा असेल, परंतु किमान ५० लाभार्थींना कर्जपुरवठा |

२४ पुढे चालू

होईल अशा पद्धतीने संस्थेने कर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. परतफेडीचा कालावधी २४ महिने, महामंडळाकडून द्यावयाच्या कर्जावर व्याजाचा दर ५ टक्के, संस्थेने लाभार्थीला दिलेल्या कर्जावर व्याजाचा दर ९ टक्के, नियमित कर्जफेड अदा करणाऱ्या लाभार्थीला अर्धा टक्का इतकी व्याज दरात सवलत.

**(ड) महिला समृद्धी योजना :—** या योजनेंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील महिलांना सरळ अथवा स्वयंसहाय्यता (एस. एच. जी.) वचत गटाच्या माध्यमातून रु. ५ लाखापर्यंत कर्ज मंजूर करण्यात येईल. एका बचत गटामधील जास्तीत जास्त २० महिलांना जास्तीत जास्त प्रत्येकी रु. २५,००० इतके कर्ज ४ टक्के व्याजदराने देण्यात येते, ९५ टक्के राष्ट्रीय मंडळाचे व ५ टक्के राज्य महामंडळाचे कर्ज. (कर्ज परतफेडीचा कालावधी २४ महिने.) २ वर्षे.

**(इ) स्वर्णिमा योजना महिलांसाठी :—** महिला लाभार्थीस वैयक्तिक रक्कम उभी करण्याची आवश्यकता नाही. ९५ टक्के राष्ट्रीय मंडळाचे व ५ टक्के राज्य महामंडळाचे कर्ज, कर्जाची मर्यादा रु. ५०,००० पर्यंत, कर्ज परत फेडीचा कालावधी ७ वर्षे, कर्जावरील व्याजाचा दर ४ टक्के संबंधित महिला कुटुंबाचे उत्पन्न ग्रामीण भागासाठी रु. १९,६५४/— व शहर भागासाठी रु. २७,२४७/— एवढे असणे आवश्यक आहे.

**(ई) व्यावसायिक व अभियांत्रिकी शिक्षण कर्ज योजना :—** आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यवस्थापन व संगणक अशा व्यावसायिक, केंद्रिय परिषदांनी मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्ज, प्रतिवर्षी जास्तीत जास्त रुपये १,२५,००० व पूर्ण अभ्यासक्रमासाठी जास्तीत जास्त रुपये ५,००,००० पर्यंत कर्ज. कर्जावरील व्याजाचा दर ४ टक्के, अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर ६ महिन्यांच्या ग्रेस कालावधीनंतर ५ वर्षात कर्ज परतफेड करणे आवश्यक. अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये ५४,००० चे आत असणे आवश्यक आहे.

(उ) स्वयं-सक्षम कर्ज योजना :

**(१) लाभार्थी पात्रता :** (अ) लाभार्थी इतर मागासवर्गीय समाजातील असावा. (ब) लाभार्थीने व्यावसायिक शिक्षण पूर्ण केलेले असावे. (क) लाभार्थी बेरोजगार असावा. (ड) तो शहरी भागात राहणारा असल्यास त्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये ५५,००० व ग्रामीण भागात राहत असल्यास वार्षिक उत्पन्न रुपये ४०,००० पेक्षा कमी असावे. (इ) लाभार्थीचे वय १८ ते ३५ वर्षे असावे.

**(२) अधिकतम कर्ज मर्यादा :** सदर योजनेखाली जास्तीत जास्त कर्ज रुपये ५ लाखापर्यंत उपलब्ध आहे.

**कर्जाचे स्वरूप :** एन. बी. सी. एफ. डी. सी. चे कर्ज ९० टक्के, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ ५ टक्के, लाभार्थीचा सहभाग ५ टक्के.

(३) व्याज दर :— ५ टक्के.

(४) कर्ज परतफेड :— सदर कर्जाची परतफेड जास्तीत जास्त ५ वर्षांचे आत करावयाची आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २४ | पुढे चालू | | | | | (५) **कोणत्या व्यावसायासाठी कर्ज उपलब्ध आहे :** कर्ज पुढील व्यावसायिक शिक्षण पूर्ण केलेल्या व्यक्तींना उपलब्ध आहे. डॉक्टर्स, वास्तुविशारद, इंजिनिअरिंग, लेखापरीक्षक, कॉस्ट अकाऊंटंट, हॉटेल मॅनेजमेंट, जॅनेटिक होम केअर, जाहिरात व्यवसायातील तंत्रज्ञ, वास्तू सेवा आणि वास्तू विशारद, सुरक्षा रक्षक एजन्सी, फॅशन डिझायनिंग, स्पर्धात्मक परीक्षा, कोचिंग क्लासेस, कल्चर आणि टूरीझम, विकास, प्रिंटिंग प्रेस, डी. टी. पी., ग्राफीक्स, ज्वेलरी डिझायनिंग, हिऱ्यांना पैलू पाडणे/पॉलिशिंग (Gemcutting/Polishing), टेक्सटाईल डिझायनिंग, हस्तकला, ब्युटी पार्लर, फिटनेस सेंटर, दगडी/धातू मूर्ती बनविणारे इत्यादी.<br><br>अर्जदाराची अर्हता व सोबत जोडावयाच्या कागदपत्रांचा तपशील खालीलप्रमाणे राहील.<br><br>(अ) अर्जदाराची अर्हता :<br><br>(१) अर्जदार इतर मागासवर्गीय असावा.<br>(२) तो महाराष्ट्राचा सर्वसाधारण रहिवासी असावा. त्याचे वय १८ ते ५० वर्षे असावे (स्वयं-सक्षम योजना सोडून) तसेच तो कोणत्याही बँकेचा, महामंडळाचा किंवा वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.<br>(३) स्वर्णिमा योजना सोडून इतर योजनांसाठी वार्षिक उत्पन्न ग्रामीण भागासाठी रुपये ४०,००० तर शहरी भागासाठी रुपये ५४,००० या मर्यादित असावे.<br>(४) कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल.<br>(५) अर्जदाराने जो व्यवसाय निवडला असेल, त्या व्यवसायाचे त्याला ज्ञान किंवा अनुभव असावा.<br>(६) कर्जाच्या इतर अटी व शर्ती महामंडळ ठरवील त्याप्रमाणे राहतील.<br><br>(ब) अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :<br><br>(१) सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या (Creamylayer Certificate) उत्पन्नाच्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती.<br>(२) जातीचे प्रमाणपत्र, शिधापत्रिकेचे प्रमाणित प्रत व पासपोर्ट साईज फोटो.<br>(३) व्यावसाय स्थळाची भाडे पावती/करारनामा, ७/१२ उतारा, दोन जामीनदार, जन्म तारखेचा दाखला व शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती.<br>(४) स्थानिक स्वराज्य संस्थांचे व्यवसाय करण्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र. |

२४ पुढे चालू

(५) अर्जदाराला ज्या प्रयोजनासाठी कर्ज मंजूर होणार आहे त्याच प्रयोजनासाठी त्याचा उपयोग करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र.

(६) तांत्रिक व्यवसायासाठी जे परवाना/लायसन्स आवश्यक असतील असे परवाने/लायसन्स.

(७) व्यवसायाचा प्रकल्प अहवाल, या अहवालासोबत लागणारा कच्चा माल, यंत्र सामग्री इत्यादींबाबतचे दरपत्रक.

वरील योजनांनुसार आतापर्यंत राज्यातील सुमारे १८,००० लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. महामंडळाचे रीतसर कार्य सुरू झाले असून सन २००९–२०१० या वित्तीय वर्षात जास्तीत जास्त लाभार्थ्यांना स्वयंरोजगार पुरविण्याचे या महामंडळामार्फत ठरविण्यात आले आहे.

आजपर्यंत खालीलप्रमाणे योजनानिहाय कर्जवाटप करण्यात आलेले आहे :—

(अ) **महामंडळाची २० टक्के बीज भांडवल योजना :** महामंडळाच्या २० टक्के बीज भांडवल योजनेंतर्गत मागील ९ वर्षांमध्ये कर्ज वितरित केल्याची माहिती.

(रुपये लाखांत)

| अ. क्र. | वर्ष | प्राप्त भाग भांडवल | लाभार्थी | कर्ज वितरित रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | १९९८–१९९९ | ५०·०० | निरंक | निरंक |
| २. | १९९९–२००० | ३५०·०० | निरंक | निरंक |
| ३. | २०००–२००१ | १५९·०० | ५०५ | ८८·४६ |
| ४. | २००१–२००२ | १०३·७० | ८५४ | १८१·५९ |
| ५. | २००२–२००३ | ४२५·२५ | ७६५ | १४७·४१ |
| ६. | २००३–२००४ | २००·०० | ८०५ | १४७·०२ |
| ७. | २००४–२००५ | ११००·०० | ८५८ | १४३·६२ |
| ८. | २००५–२००६ | १०००·०० | १·००५ | २४०·२७ |
| ९. | २००६–२००७ | ५००·०० | ८६३ | १२८·१९ |
| १०. | २००७–२००८ (माहे ऑगस्ट ०७ पर्यंत) | ... | ११७ | ३१·४६ |
| | एकूण ... | ३,८८७·९५ | ५,७१९ | १,०८९·६१ |

(ब) राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाच्या योजनेंतर्गत मागील सहा वर्षांमध्ये मंजूर प्रकरणे, प्राप्त निधी व वितरित निधी यांचा तपशील :

(रुपये लाखांत)

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २४ | पुढे चालू | | | | | |

| अ. क्र. | वर्ष | मंजूर प्रकरणे लाभार्थी संख्या | मंजूर प्रकरणे रक्कम | प्राप्त निधी | वितरित | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २००१—२००२ | ४,६१ | ३,३७·५१ | २,८०·०० | २,२३·४५ | १,८५ |
| २. | २००२—२००३ | १,९५१ | १२,६८·३७ | ६,६९·६५ | ५,७०·३४ | १,२४४ |
| ३. | २००३—२००४ | ८,०५० | ३९,३०·३८ | २२,९९·५० | २०,५३·५७ | ४,४४६ |
| ४. | २००४—२००५ | १,०१६ | ४,६८·५६ | १६,००·०० | १७,८२·०३ | २,०१८ |
| ५. | २००५—२००६ | ४,३५ | ३६·०० | १२,००·०० | ९,११·७६ | २,३५१ |
| ६. | २००६—२००७ | १,२४३ | १६,७५·९५ | १५,००·०० | १२,६४·८८ | १,४३८ |
| ७. | २००७—२००८ (ऑगस्ट ०७ पर्यंत) | ७,३८ | ७,५८·१८ | १०,००·०० | ३,९७·५० | ५,६० |
| | एकूण ... | १३,८९४ | ८४७४·९५ | ८५४९·१५ | ७२११·५३ | १२,२४२ |

योजनानिहाय कर्ज वाटपाचा तपशील (माहे ऑगस्ट ०७ पर्यंत)

| अ. क्र. | योजना | एकूण लाभार्थी | एकूण रु. लक्ष |
|---|---|---|---|
| (अ) | बीज भांडवल योजना | ५,७११ | १०८९·६१ |
| १. | दीर्घ मुदती कर्ज योजना | ६,४१५ | ५८४५·६८ |
| २. | सूक्ष्म पतपुरवठा योजना | २,८९३ | २५२·०५ |
| ३. | शैक्षणिक कर्ज योजना | १,६०९ | ३८९·१७ |
| ४. | स्वर्णिमा योजना | १,०९५ | ४२९·५५ |
| ५. | मार्जिन मनी योजना | १५७ | २६५·४१ |
| ६. | स्वयं-सक्षम योजना | २७ | २०·८८ |
| | | ७० | ८·७९ |
| (क) | राष्ट्रीय महामंडळाच्या योजनांत | ... | ६६८·६२ |
| | एकूण (ब + क) | १२,२६६ | ७८८०·१५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २५ | वसंतराव नाईक विजाभज विकास महामंडळ बीज भांडवल योजना प्रधान लेखा शीर्ष. (२२२५ + ४२२५) | २०१८–२०१९ | ५००.०० | ३४७.०० | ११ | वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ कंपनी कायदा १९५६ नुसार दिनांक ८-२-१९८४ रोजी झाली आहे. त्यानुसार.<br>**योजनेचे उद्दिष्ट व स्वरूप :** महामंडळामार्फत विमुक्त जाती, भटक्या जमातीमधील आर्थिक दृष्ट्या दुर्बल कुटुंबातील व्यक्तींना सवलतीच्या व्याजदराने अर्थसहाय्य देण्यात येऊन दुर्बल घटकाची आर्थिक उन्नती करणे.<br>**योजनेच्या अटी व शर्ती :** (१) लाभार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा. (२) लाभार्थी विमुक्त जाती, भटक्या जमाती पैकी असावा. (३) अर्जदाराचे वय १८ ते ५० पर्यंत असावे. (४) अर्जदार महामंडळाचा, बँकेचा व वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा. (५) राज्य महामंडळाच्या योजनांकरिता शहरी व ग्रामीण भागातील अर्जदारांचे कौटूंबिक वार्षिक उत्पन्न रु. १.०० आणि केंद्रीय महामंडळाच्या योजनांकरिता शहरी भागाकरिता रु. १.२० लाख व ग्रामिण भागाकरिता रु. ९८,०००/- पर्यंत असावे. (६) कुटुंबातील एकाच व्यक्तीस योजनेचा लाभ देता येईल. (७) अर्जदाराने जो व्यवसाय निवडला आहे त्याचे किमान ज्ञान किंवा अनुभव असावा. (८) कर्जाच्या अटी व शर्ती महामंडळ ठरवेल त्याप्रमाणे राहतील.<br>**लाभाचे स्वरूप :** प्रकल्प किमतीच्या २५% बीज भांडवल ४% व्याजाने दोन जामीनदार घेऊन लाभार्थ्यास वाटप केले जाते. संबंधित जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक, विजाभज विकास महामंडळ यांचेकडे अर्ज सादर करावा. |
| | | २०१९–२०२० | ... | ३४०.०० | ... | |
| | | २०२०–२०२१ | ... | ... | ... | |
| | | २०२१–२०२२ | १,००,००.०० | १,००,००.०० | ... | |
| | | २०२२–२०२३ | १,००,००.०० | ... | ... | |
| | | २०२३–२०२४ | | | ... | |
| | | | | | ... | |
